cmyk

## संपादकीय

### आघाडीचे ऐक्य

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' आघाडीने भाजपविरोधासाठी ऐक्याचे जोरदार प्रदर्शन करून जे प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे ते पाहता 'इंडिया' आघाडीने संकटातील संधी योग्यरीत्या साधली आहे, असेच म्हणावे लागेल. 'इंडिया' आघाडी अस्तित्वात आल्यापासून भाजपची 'अजेय जोडी' या आघाडीच्या ऐक्याला सुरुंग लावण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न करते आहे. दुर्दैवाने इंडिया आघाडीतील काही पक्षांच्या नेत्यांचे अहंकार व त्यांच्या सुप्त महत्त्वाकांक्षा यामुळे भाजपच्या प्रयत्नांना यश मिळून विरोधकांच्या या ऐक्याच्या चिरफळ्याच उडत असल्याचे चित्र होते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### माजी पंतप्रधान मनमोहन सिंग राज्यसभेतून निवृत्त

नवी दिल्ली : माजी पंतप्रधान आणि काँग्रेस नेते मनमोहन सिंग हे राज्यसभेतून निवृत्त झाले आहेत. राज्यसभेत ३३ वर्षांची कारकीर्द गाजवल्यानंतर माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग निवृत्त होत आहेत. त्यांच्यासोबतच राज्यसभेच्या ५४ खासदारांचा कार्यकाळ समाप्त झाला आहे. यापैकी अनेक जण लोकसभा निवडणूक लढवत आहेत, तर काही खासदार असे आहेत ज्यांची पुन्हा राज्यसभेत नियुक्ती होणार आहे. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग ३ एप्रिल रोजी राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. सध्या ते ९१ वर्षांचे आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ०३ अंक–३५२ गुरूवार दि.०४ एप्रिल २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 ▪ पाने– ६ किंमत ३ रूपये

# ७ एप्रिलला शेतकऱ्यांचा देशभरात मोर्चा

## शंभू सीमेवर रेल्वे ट्रॅक रोखण्याचीही घोषणा

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्र सरकारला इशारा दिला आहे. तसेच आपल्या मागण्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पुन्हा एकदा रेल्वे ट्रॅक रोखण्यासह मोर्चा काढण्याची घोषणा शेतकरी नेत्यांनी केली आहे. ७ एप्रिलला देशभर मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून, भाजपच्या पुतळ्याचे दहन करण्यात येईल. तसेच ९ एप्रिलला शंभू सीमेवर रेल्वे ट्रॅक रोखला जाईल, असा



इशारा शेतकरी नेत्यांनी किसान भवन, चंदीगड येथे पत्रकार परिषदेत बुधवारी (दि. ०३) दिला. यावेळी जगजीतसिंग डल्लेवाल, श्रवणसिंह पंढेर, लखविंद्रसिंग औलख, अमरजीतसिंह मोहडी यांच्यासह इतर शेतकरी नेते उपस्थित होते.

हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी हरियाणा आणि पंजाबचे शेतकरी १३ फेब्रुवारीपासून आंदोलन करत आहेत. आंदोलक शेतकरी दिल्लीच्या जवळ असणाऱ्या शंभू, खनौरी, डबवली आणि रतनपुरा सीमेवर आंदोलन करत असून शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे केंद्रातील मोदी सरकारने दुर्लक्ष केले आहे. तर जोपर्यंत मागण्यांवर ◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यांना त्रास देण्यासाठी सीमेवरील वीज खंडीत

तर फक्त शेतकऱ्यांना त्रास देण्यासाठी शंभू बॉर्डर, खनौरी, डबवली, रतनपुरा सीमेवरील वीज जाणीवपूर्वक खंडित करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. तर यावेळी संयुक्त किसान मोर्चा (गैर–राजकीय) आणि किसान मजदूर मोर्चा राज्यातील बाजार समित्या वाचवणे, शेकतरी नेत्यांची सुटकेसह सीमेवरील खडीत वीज पुरवठा सुरळीत सुरू व्हावा यासाठी ७ एप्रिलला देशभरात जिल्हास्तरीय मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. तर या मोर्चात भाजपचा पुतळा जाळण्याचाही इशारा शेतकरी नेत्यांनी दिला आहे.

# तिढा सुटेना, बुधवारचा दिवसही प्रतीक्षेतच गेला

## » ज्योतीताई मेटे की बजरंग सोनवणे संभ्रम कायम; ज्योतीताईंनी घेतली शरद पवारांची भेट





बीड । प्रतिनिधी


**बीड लोकसभेसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार कोण असेल याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे. ज्योतीताई मेटे की बजरंग सोनवणे यापैकी कोण उमेदवार द्यायचा याबाबतचा तिढा बुधवारीही सुटू शकला नाही. दरम्यान, ज्योतीताई मेटे यांनी बुधवारी सिल्वर ओक वर जाऊन शरद पवार यांची भेट घेतली.**

लोकसभा निवडणुका लागल्या असून, प्रचाराची रणधुमाळीही सुरू झाली आहे. बीड लोकसभेसाठी भाजपकडून पंकजाताई मुंडे यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे मात्र महाविकास आघाडीकडून अद्यापही उमेदवाराची घोषणा करण्यात आलेली नाही. बीड लोकसभेची जागा ही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट लढणार आहे. शरद पवार पंकजा मुंडे यांच्या विरोधात कोणता उमेदवार देणार याबाबत पहिल्यापासूनच वेगवेगळ्या अटकळी बांधण्यात आल्या. बऱ्याच नावांची चर्चा झाल्यानंतर आता स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे आणि अजित पवार गटातून शरद पवार गटात आलेले बजरंग सोनवणे यांच्या नावापर्यंत येऊन ही चर्चा थांबली आहे. या दोन नावांपैकीच एकाचे नाव उमेदवारीसाठी निश्चित केले जाणार आहे. बजरंग सोनवणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश घेतल्यापासूनच आपल्यालाच तिकीट मिळणार ◀◀ पान २ वर

### ज्योतीताई मेटे यांची अपक्ष लढण्याची तयारी?

ज्योतीताई मेटे यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन सक्रिय राजकारण करण्याचे निश्चित केले आहे. या लोकसभेमध्ये त्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटातून लढण्यास इच्छुक आहेत मात्र, शरद पवार काय निर्णय घेतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे. शरद पवार यांच्याकडून संधी मिळाली नाही तरी ज्योतीताई मेटे या ही लोकसभा अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याचे सूत्रांकडून समजते.

# निवडणूक आयोगाची शिवसेना शिंदे गट, भाजपाला कायदा उल्लंघनप्रकरणी नोटीस



मुंबई । प्रतिनिधी

देशातील लोकसभा निवडणूकीचा प्रचारा आता हळूहळू चांगलाच तापत असल्याचे दिसून येत आहे. नुकतेच महाराष्ट्रातील सर्वच सत्ताधारी आणि विरोधी राजकिय पक्षांनी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आपापल्या स्टार प्रचारकांची यादी जाहिर केली. परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाने जाहिर केलेल्या स्टार प्रचारकांच्या यादीवर हरकत घेत तशी तक्रार राज्याच्या ◀◀ पान २ वर






# केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार यांच्या ताब्यात

## चेअरमनपदी बालासाहेब बोराडे तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय ठोंबरे बिनविरोध

केज प्रतिनिधी

**केज तालुका खरेदी – विक्री संघावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाच्या ताब्यात आली असून बजरंग सोनवणे यांचेच वर्चस्व कायम राहिले आहे. चेअरमनपदी ज्येष्ठ नेते बालासाहेब (दादा) बोराडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.**




केज येथील खरेदी विक्री संघ बजरंग सोनवणे यांच्या ताब्यात आहे. दरम्यान आताच झालेल्या बिनविरोध निवडणुकीत बजरंग सोनवणे यांचे वर्चस्व कायम राहिले आहे. सन २०२४-२९ च्या बिनविरोध झालेल्या निवडणुकीत संघावर संस्था मतदार संघातून उमेदवार विश्वास शिवाजीराव पाटील, गोपीनाथ वामनराव इनकर, डॉ. हर्षदा बजरंग सोनवणे, अशोक गोविंदराव नेहरकर, महानंदा श्रीराम ◀◀ पान २ वर

# उद्धव ठाकरे यांच्याकडून कल्याण, हातकणंगले, पालघर आणि जळगांवसाठी उमेदवार जाहिर



मुंबई । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे यांनी निष्ठावंत महिला शिवसैनिक वैशाली दरेकर–राणे यांना कल्याण–डोंबिवली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देत असल्याचे जाहिर केले. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून सत्यजीत पाटील यांना तर पालघरमधून आदिवासी महिला भगिणी भारती कांबळे यांना उमेदवारी जाहिर ◀◀ पान २ वर

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावर हल्ला

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्याचे एकनाथ शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावर अज्ञात लोकांनी खंडेश्वरी बायपासच्या पुलाजवळ गाडी आडवून हल्ला केल्याची घटना सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली असून ज्ञानेश्वर खांडे यामध्ये जखमी झाले असून त्यांना जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे समजते.**

उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे हे गावाकडे जात असताना सायंकाळी ६.३० च्या सुमारास अज्ञात लोकांनी खंडेश्वरी नजीकच्या बायपास जवळ त्यांच्या ◀◀ पान २ वर

# बीडच्या तरूणाचा परळीच्या महिलेशी फेसबुक मैत्री करून अत्याचार

बीड । प्रतिनिधी

आपण मैत्री करताना कोणत्या व्यक्तीबरोबर करतो याचे भान ठेवून वागले पाहिजे. महिला आणि पुरूषाची मैत्री कधी अंगलट येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करताना आपल्याला त्यापासून काही इजा पोहचणार नाही याची खात्री केली पाहिजे. खात्री न केल्यामुळे अनेक अडचणी येऊ शकतात याचाच प्रत्यय परळीतील महिलेला आला आहे. बीडच्या एका मुलासोबत फेसबुकवर मैत्री केली आणि त्याच मैत्रीतून सदरील महिलेवर अत्याचार करत पतीला व सदरील महिलेला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे.

परळी वै येथील शारदानगर भागातील ३२ वर्षिय गृहिणी महिलेने फेसबुकवर ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | | |
| ३,२५२ | ३,२५२ | ३,२५२ |
| ज्वारी/हायब्रिड :१५९.५० क्विंटल | | |
| १,८०० | ३,४३५ | २,६१३ |
| मूग :०.५० क्विंटल | | |
| ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : २.५० क्विंटल | | |
| ८,४६० | ९,७०० | ९,२२३ |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: २३.५० क्विंटल | | |
| २,४६० | २,७०० | २,५९० |
| चिंचोका/लोकल: ४.०० क्विंटल | | |
| १,९०० | १,९०० | १,९०० |
| सोयाबीन: ८७.५० क्विंटल | | |
| ४,४५० | ४,६२१ | ४,५१६ |
| हरभरा: ८.०० क्विंटल | | |
| ५,३०० | ५,७६० | ५,५२७ |

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले प्रचारासाठी बीडला येणार

## पंकजाताई मुंडे यांनी घेतली रामदास आठवले यांची भेट



मुंबई । प्रतिनिधी

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांची भाजपा राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट घेऊन निवडणुकीसाठी आशीर्वाद घेतले.**

पंकजाताई मुंडे यांनी ना. रामदास आठवले यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली व निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. यावेळी आठवले ◀◀ पान २ वर






cmyk

cmyk



## अग्रलेख

# आघाडीचे ऐक्य...

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' आघाडीने भाजपविरोधासाठी ऐक्याचे जोरदार प्रदर्शन करून जे प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे ते पाहता 'इंडिया' आघाडीने संकटातील संधी योग्यरीत्या साधली आहे, असेच म्हणावे लागेल. 'इंडिया' आघाडी अस्तित्वात आल्यापासून भाजपची 'अजेय जोडी' या आघाडीच्या ऐक्याला सुरुंग लावण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न करते आहे. दुर्दैवाने इंडिया आघाडीतील काही पक्षांच्या नेत्यांचे अहंकार व त्यांच्या सुप्त महत्त्वाकांक्षा यामुळे भाजपच्या प्रयत्नांना यश मिळून विरोधकांच्या या ऐक्याच्या चिरफळ्याच उडत असल्याचे चित्र होते. आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसने सामंजस्याची भूमिका घेऊन मनाचा मोठेपणा दाखविण्याची तयारी दर्शवूनही तृणमूल काँग्रेस, आप, सपा वगैरे पक्षांनी आडमुठी भूमिका घेतल्याने आघाडीच्या जागावाटपात ऐक्याचे दर्शन होऊ शकले नव्हते. त्यामुळे भाजपविरोधात प्रचाराचे एकत्रित रणशिंग फुंकण्याचा इंडिया आघाडीचा प्रयत्न सफल होताना दिसत नव्हता. राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने इंडिया आघाडीच्या ऐक्याचे दर्शन घडविण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता. मात्र, तृणमूल काँग्रेस, डाव्या पक्षांनी यावर बहिष्कार घातल्याने अपेक्षित एकजुटीचे प्रदर्शन घडण्याऐवजी उलट मतभेदांवरच जोरदार चर्चा झडली. त्यामुळे आपापल्या संकटाचा प्रतिकार करण्याच्या निमित्ताने का असेना दिल्लीच्या रामलीला मैदानावर सगळे विरोधक एकत्र आले आणि विरोधकांच्या ऐक्याची वज्रमूठ देशवासीयांना पहायला मिळाली, हे आघाडीच्या दृष्टीने चांगलेच घडले.

या शक्तिप्रदर्शनास नैमित्तिक कारण ठरले ते दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची अटक. त्याला झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या अटकेची व ऐन निवडणुकीच्या तोंडावर आयकर विभागाने काँग्रेससह विरोधी पक्षांना दंडाच्या नोटिसा पाठवून त्यांची बँक खाती गोठवण्याची जोड मिळाली. भाजपेतर पक्षांना नेमके काय म्हणायचे आहे आणि ते भाजपविरोधात का लढत आहेत, हे रामलीला मैदानावरून देशभरातील जनतेपर्यंत स्पष्टपणे व एकत्रितपणे पोहोचवण्याची संधी इंडिया आघाडीला या सभेद्वारे साधता आली. २०२४ ची निवडणूक खुली व निष्पक्ष होण्यात सत्ताधारी भाजप जाणीवपूर्वक अडथळे आणत आहे, देशात लोकशाही व्यवस्था टिकवायची असेल तर भाजपची ही दादागिरी थांबवावीच लागेल, केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था असून तिने भाजपची ही दादागिरी थांबवून विरोधी पक्षांची गळचेपी थांबवली पाहिजे हे विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या सभेतून देशातल्या जनतेला सांगितले. विरोधकांच्या गळचेपीच्या आरोपांमध्ये तथ्य असणाऱ्या घटना नजीकच्या काळात घडल्याने हे केवळ तथ्यहीन आरोप आहेत असे म्हणता येणार नाही, हे देशातील जनतेलाही ज्ञात आहेच. लोकसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर प्राप्तिकर विभागाला काँग्रेसच्या कर परताव्यातील अनियमिततेची प्रकर्षाने आठवण होते. काँग्रेसची बँक खाती गोठवत क्रमाक्रमाने दंडाची रक्कम वाढविली जाते आणि त्याविरोधात काँग्रेसने न्यायालयात धाव घेतल्यावर 'लोकसभा निवडणूक होईपर्यंत आम्ही कारवाई करणार नाही', अशी साळसूद भूमिका प्राप्तिकर खाते घेते. मग प्राप्तिकर खात्याला हे शहाणपण न्यायालयात आल्यावरच सुचते हा निव्वळ योगायोग समजायचा का? ईडी ही देखील स्वायत्त संस्था. मात्र, दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल व हेमंत सोरेन यांच्या अटकेचे या स्वायत्त संस्थेने साधलेले 'टायमिंग' हा ही निव्वळ योगायोग समजायचा का? केजरीवाल दोषी असतील तर त्यांना त्यांच्या मंत्रिमंडळातील साथीदारांसोबत वर्षभरापूर्वीच अटक का करण्यात आली नाही? असे प्रश्न नक्कीच उपस्थित होतात. भाजप प्रचंड आर्थिक व राजकीय सत्तेच्या बळावर निवडणुकीचे स्वरूप एकतर्फी बदलून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा विरोधकांच्या आरोपावर 'आम्ही यंत्रणांच्या कारभारात हस्तक्षेप करत नाही. तुम्ही कायदा मोडता म्हणून तुम्हाला शिक्षा होते', असा साळसूद युक्तिवाद करून उडवून लावण्याचा प्रयत्न सत्ताधारी भाजप करतो आहे. मात्र, घडणाऱ्या घटना विरोधकांचे आरोप अगदीच तथ्यहीन नाहीत हे दाखवून देण्यास पुरेशा आहेत. त्यामुळे सत्ताधारी भाजपला विरोधकांचे आरोप असेच उडवून लावता येणार नाहीत. तर निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्ष निष्पक्ष भूमिका घेत असल्याचे जनतेला प्रत्यक्ष दिसावे लागेल व पटावे लागेल! अन्यथा विरोधक निवडणूक प्रक्रियेवर घेत असलेली शंका योग्यच ठरेल. रामलीला मैदानावरून एकत्रितरीत्या हे प्रश्न जोरकसपणे देशासमोर आणण्यात इंडिया आघाडी यशस्वी ठरली आहे, हे नक्की. त्याचा भाजपच्या कार्यशैलीवर कितपत परिणाम होईल, हा प्रश्न अलहिदा मात्र, भाजपच्या दादागिरीस समर्थपणे प्रतिकार करण्याची संधी इंडिया आघाडीला आपल्या या ऐक्याच्या प्रदर्शनातून निश्चित साधता येते, इंडिया आघाडी ती कशी साधणार यावर येत्या निवडणुकीचे गणित ठरणार आहे.



## जळीत दुर्घटनेतील मृत व्यक्तींना राज्यसरकारकडून मदत मिळवून देणार - मंत्री अतुल सावे

**छत्रपती संभाजीनगर**

**शहारातील छावणी परिसरात बुधवारी (दि. ३) पहाटे ३ वाजता अचानक एका कपड्याच्या दुकानाला आग लागली. या घटनेत एकाच कुटुंबातील सात व्यक्तींचा गुदमरून मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर राज्याचे गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी बुधवारी सकाळी छावणी परिसरातील घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी या पिडीत कुटुंबाला राज्यसरकारकडून मदत मिळवून देणार असल्याचे सांगितले.**

यावेळी मंत्री अतुल सावे यांनी झालेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून मृत व्यक्तीच्या परिवाराला या घटनेतून सावरण्याचे बळ मिळो तसेच राज्य सरकारच्या वतीने मृतांच्या नातेवाईकांना सर्वतोपरी मदत केली जाईल. या संदर्भात आपण स्वतः जिल्हाधिकारी यांच्यासोबत दूरध्वनी वरून संपर्क केला असल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी प्रसार माध्यमांना दिली. या घटनेत लवकरात लवकर मदत कशी मिळेल याकरिता आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या आगीत ३ महिला, २ लहान मुले आणि २ पुरुष यांचा मृतात समावेश आहे.

# नदी नांगरून जलस्तर आला ५०० फुटावरून ९० फुटावर!

## शहादा तालुक्यात सुमारे २३ वर्षांपूर्वी केला होता अनोखा यशस्वी प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

**शेत नांगरावे लागते ही गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे, पण नदी नांगरणे हे ऐकायला कसेसेच वाटते ना? सुमारे वीस वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे, पण तिचे समकालीन मूल्य मात्र आजही तितकेच आहे. शहादा तालुक्यातील गोमाई या नदीच्या काठावरचे डांबरखेडा हे गाव. गोमाई मध्यप्रदेशातून वाहत सातपुड्याच्या डोंगररांगातून महाराष्ट्रातल्या प्रकाशा या गावी तापीला येऊन मिळते. संगमावर असल्याने प्रकाशा दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे.**

२००० ची गोष्ट आहे. डांबरखेडा परिसरात अचानक असे लक्षात आले की, परिसरातील बऱ्याच विहिरी, बोअरवेलना पाणी येत नव्हते. चारसहा महिने जिवंत असणाऱ्या गोमाई नदीच्या काठावर असून देखील डांबरखेड्याच्या विहीरी, बोअर मृत होत होते. पाचशे ते सातशेफुटापर्यंत जलस्तर खोल गेला. लोक बोअरची खोली तेवढी वाढवत होते. पण पाणी वरती येत नव्हते. असे का ? शेतकरी हैराण. कुणाकडे नीट उत्तर नव्हते. मोतीलाल पाटील (पटेल) तात्या. नांदरखेडा त्यांचे गाव. शहाद्याला त्यांना डांबरखेड्यावरून जावे लागते. त्यामुळे डांबरखेड्याची पाणी



समस्या मोतीलाल तात्यांच्याही चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाली होती. तात्या पुणे विद्यापीठाचे १९७० चे एम एस्सी ॲग्री. डांबरखेड्याची ही समस्या सार्वजनिक होती. गावात नदी असून विहरी, बोअर कोरड्या होत्या. सर्वचजण विचारात पडले होते, पण उत्तर सर्वांकडे नव्हते. तात्यांनी एकेदिवशी डांबरखेड गावाच्या सरपंचांना मनातल्या चार गोष्टी सांगितल्या. खूप दिवसानंतरच्या आपल्या चिंतनाचा परिपाक लोकांपुढे ठेवला. समस्येचा मुळापर्यंत जाऊनच उत्तर सापडतात. आणि ती चिरस्थायी असतात. जलस्तर खोल गेला या समस्येवर तात्यांनी सांगितलेला उपाय अगदीच वेगळा होता. काहीसा वेडेपणाचा, पण त्यामागे अभ्यास, संशोधन आणि चिंतन होते. लोकांनी तात्यांचे ऐकले आणि पाचशे ते सातशे फुटावर गेलेला जलस्तर चक्क नव्वद फुटावर आला. डांबरखेडच्या लोकांसाठी तात्यांनी स्वतः डिझल पुरवले, ट्रॅक्टर, लाकडी नांगर, लोखंडी नांगर अशा साधनांनी गोमाई नदी उन्हाळ्यात नांगरायला सुरुवात केली. लोखंडी फाळ वाकले. चार किमी. नदी आडवी नांगरायचा हा अजब प्रयोग काहीसा चेष्टेचा विषय झाला. गावकऱ्यांनी फक्त एक किलोमीटर इतकीच नदी नांगरली. जून कोरडा गेला, जुलैत पहिला पाऊस पूर आला. मात्र गोमाईचा हा पूर तापीला भेटायला गेला नाही. नांगरलेल्या नदीने रात्रीच सर्व पूरपाणी पिऊन टाकले. अवघ्या चोवीस तासात पाचशे फुटावरचे पाणी नव्वद फुटावर आले. लोक आनंदले. सकाळी परिसरातील मोटारींनी फोर्सने पाणी फेकले.

### शक्य आहे तिथे नदी नांगरा !

सध्या उन्हाळ्यात नद्या कोरड्या पडतात. नदीतील वालुका, दगड-गोटे दिसत असतात. भूशास्त्र असे सांगते की नदीचा प्रवाह जमिनीच्या मऊ भागातून जात असतो व त्यामुळे ती खोल खोल होत असते व तिचे ऊंच किनारे तयार होतात. अनेक मोठ्या नद्या डाईक किंवा फॉल्ट झोनमधून वहात असतात. नदीच्या या पात्रात पावसाळ्यातील गाळ साचल्यामुळे पात्र जलाभेद्य होते व पावसाळ्यातील नदीत वाहणारे पाणी जेवढे भूगर्भात जायला हवे तेवढे जात नाही. त्यासाठी सामुदायिक ट्रॅक्टर चा उपयोग करून नदीची शक्य आहे तेवढी नांगरणी आवश्यक आहे.

तत्कालीन जिल्हाधिकारी असीमकुमार गुप्ता यांनी नदी नांगरण्याच्या या अभिनव प्रयोगाचे शिल्पकार म्हणून मोतीलाल तात्यांना " वॉटर मॅन ऑफ शहादा " असे संबोधून तात्यांचे तोंडभरून कौतुक केले होते. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य सचिव अजित निंबाळकर यांनी मोतीलाल तात्यांच्या या जगावेगळ्या प्रयोगाची पाहणी करून कौतुक केले. नदी नांगरण्याची ही अभिनव कल्पना कशी सुचली? या विषयी सांगताना तात्या बोलले, "दरवर्षी येणाऱ्या गढूळ पूरपाण्यातले फाईन पार्टीकल वाळूत साचून साचून दोन-तीन फुटावर हे पार्टीकल सेटल होतात, थरावर थर साचून त्याचे खडकीकरण होत जाते. अर्थातच पाणी खाली न झिरपता वाहून जाते. माझ्या अनेक वर्षांच्या अभ्यास आणि चिंतनातून मला समस्येचे हे कारण लक्षात आले. " खेतीया या मध्यप्रदेशातील शहारापर्यंतच्या अनेक गावातील लोकांनी नंतर सातत्याने गोमाई नदी नांगरली आहे, आणि वाहून जाणारे पाणी आपल्याच गावात जिरवले आहे. हे तात्यांच्या कल्पक प्रयोगाचे फलित आहे. निराश न होतो, आत्महत्येचा पर्याय न अवलंबता शेतकऱ्यांनी आपल्या समृद्धीचा जलस्तर जिवंत करण्यासाठी काय करता येईल याचा शोध घेतल्यास उत्तर नक्की सापडेल. मोतीलाल तात्या पटेल या वेड्या माणसासारखा परिपक्व विचार शेतकऱ्याने करावा बस. हा प्रयोग प्रत्येक गावाने केला तर आपले गाव पण पाण्याच्या समस्येतून मुक्त होईल.

# जब हम जवाँ होंगे.....मतदार होंगे !



लहानपणी बघितलेली स्वप्नं पूर्ण करणं तारुण्यात आणि सज्ञान झाल्यावर आवश्यक असतं यात मतदार म्हणून हक्काचा स्वप्न पूर्ण झालेल्या प्रत्येकाने आपला हक्क देखील बजावला पाहिजे मतदान केलं पाहिजे.

एक गाणं खूप लोकप्रिय झालेलं त्यात मोठ्या स्वप्न रंजनाची गोष्ट होती जब हम जवाँ होंगे जाने कहा होंगे या स्वप्नरंजनात लहानपणी अनेक जण असतात आणि त्या वयात मोठा झाल्यावर काय करायचं याचं मनोनियोजन होत असत. आपण आपली सामाजिक आणि आर्थिक स्थिती जाणून असतो आणि त्यावेळी असणाऱ्या आपल्याच वयाच्या मुलाप्रमाणे बाल सुलभ स्वप्न बघत असतो. बालमनाला नव्याची ओढ आणि कुतुहल मोठ्या प्रमाणावर असतं जे आपल्याला आज करू देत नाही ते करण्याची नैसर्गिक वृती आणि उर्मी मनात दौडत असते. मोठं झाल्यावर काय? पालक आपल्या परीने घरात डॉक्टर घडवायचा की इंजिनिअर असे आडाखे बांधत असतात पण बालमनाला वेगळीच ओढ असते एक मात्र खरं प्रत्येकाला मोठं व्हायचं आणि मोठेपणी काहीतरी करायचं नक्की असतं काही धुसर चित्र मनात असतात आणि ती पूर्ण करण्याचे प्रयत्न देखील याच वयात सुरु होतात. मोठं झाल्यावर वाहन चालवण्याचा परवाना मिळवायचा हे अमेरिकन मुलांचं कायम स्वप्न असतं कारण वेगाचं वेड प्रत्येक ठाई असतं आणि त्यासाठी त्याची धडपड देखील असते आपल्याकडे देखील मुलांना असंच वाटतं पण आजची पिढी बघता असं म्हणता येईल की साऱ्यांना क्रिकेट आणि सोशल मिडियाने भारून ठेवले आणि जागोजागी याचा आपणास प्रत्यय येतो. आयपीएलची मॅच म्हणजे पर्वणी सारं काही विसरून प्रत्येकाला क्रिकेट बघण्याची ओढ आणि क्रिकेटर होण्याचं वेड आहे. उरला वेळ मग इन्स्टा, फेसबुक यावर दिसणाऱ्या विश्वात रंगत नवीन स्वप्न बघायला वेळ राहत नाही. घरच्यांनी धोषा लावला म्हणून अगदी अपरिहार्यपणे अभ्यासाकडे वळणारे बहुसंख्य आहेत. आपल्या देशाच्या या लोकशाही रचनेत आपण स्वतःला आर्थिक आणि सामाजिक भान मिळायला पाहिजे हे त्या वयात जाणवत नाही बालकांचं आणि तरुणांचं ठिक आहे परंतु पालकांचं काय असा सवालही यानिमित्ताने उभा राहतो. आजची पिढीही उद्याचं भविष्य आहे आणि ते भविष्य आम्हाला घडवायचं आहे हे आपण नेहमी भाषणांमधून ऐकत आलो आहोत प्रत्यक्षात कृती मात्र होताना दिसत नाही.एकाच वेळी एकोणिसाव्या आणि वीसाव्या आणि एकविसाव्या शतकात जगणारी पिढी असं योग्य वर्णन ठरेल आणि त्याच स्वरूपाची विसंगती प्रत्यक्षात आपणास दिसून येत आहे. हक्कासाठी भांडायचं आणि कर्तव्य टाळायचं असा विकासाचा मार्ग असू शकत नाही. देशासाठी तर नाहीच पण वैयक्तिक आयुष्यातही नाही.

मराठी सज्ञान, सुशिक्षित, सुसंस्कृत, संपन्न अनेक शब्द आहेत की जे व्यक्तींची ओळख करून देतात आणि त्यांचे व्यक्तिमत्व कसं आहे हे जगापुढे मांडतात. यात सज्ञानी एक संज्ञा आहे. शिक्षण घेतलं तो सुशिक्षित आहे पण सज्ञानि कोण? मुळात या शब्दाचा प्रत्यक्ष ज्ञानाशी संबंध नाही जगात जगण्या- वागण्याची रीत ज्याला कळाली तो सज्ञानी अशी सोपी व्याख्या करता येईल आणि आज हे सारं मांडायचं कारण अर्थात हाच सज्ञान वर्ग मतदार आहे आणि त्यांच्यावर नव्या देशाच्या भवितव्याची जबाबदारी आहे.

आपल्याकडे पात्र मतदारांचे वय हे १८ करण्यात आलं त्यावेळी पासून या सगळ्या पिढीकडून नव्या नेतृत्वाला पुढे नेण्याची अपेक्षा आहे. राजकीय पातळीवर बऱ्याच घडामोडी होत असतात त्याचे योग्य व विश्लेषण करून या सर्वांनी मतदान करून लोकप्रतिनिधी निवडावा अशी अपेक्षा आहे. मुळात प्रबोधन करावे लागते ते मतदान करा करा.. करारे.. कारण ज्या मतदारांनी बदलत युग अनुभवला आहे आणि त्यांची मत आजच्या काळाच्या गतीशी जुळणारी आहेत अशा युवा पिढीवरच ही जबाबदारी अधिक आहे. त्यासाठी मतदानाचा दिवस सुट्टीचा दिवस किंवा आपल्या एका मताने किती फरक पडणार आहे अशी मानसिकता दूर करण्याची गरज आहे. कोणता प्रतिनिधी आपल्या प्रश्नांना सोडवू शकतो आणि कोणत्या प्रतिनिधीत तितकी प्रगल्भता आहे हे मतदारांनी ठरवायचं आहे. निवडणूक म्हटलं की प्रचार हा आला परंतु प्रचारात दिली गेलेली वचने किंवा आश्वासने कितपत वास्तवाला धरून आहेत. त्याच्या पुर्ततेची किती शक्यता आहे याची तपासणी करून मतदान करावी ही देखील अपेक्षा आहे. निवडणुकीला नकारात्मक पद्धतीनं न बघता जसं जब हम जवाँ होंगे. मतदार होंगे याची जाणीव ठेवावी कदाचित त्याचं स्वप्न पाहिलं नसेल परंतु या वयात हा अधिकार मिळालाय म्हणून जागरूक मतदार जरूर व्हा आणि आपण जबाबदारीने आपलं नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासून घेणे, मतदान केंद्राची माहिती घेणे तसेच सर्वाधिक महत्त्वाचा म्हणजे मतदानाच्या दिवशी मतदान करणे ही आपली जबाबदारी आहे. आपलं हे राष्ट्रीय कर्तव्य या सज्ञान झालेल्या पिढीने पार पाडलच पाहिजे ज्यामुळे लोकशाही अधिक मजबूत होईल.

**(प्रशांत दैठणकर)**
**जिल्हा माहिती अधिकारी,बीड**
**मो.९८२३१९९४६०**

## पान १वरून...

### ७ एप्रिलला शेतकऱ्यांचा

तोडगा निघत नाही. तोपर्यंत मागे न हटण्याची भूमिका शेतकरी नेत्यांनी घेतली आहे. यादरम्यान आता पुन्हा एकदा आंदोलक शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांवरून आक्रमक पवित्रा घेताना ७ एप्रिल रोजी देशभर मोर्चांचे आयोजन आणि ९ एप्रिल रोजी शंभू सीमेवर रेल्वे ट्रॅक रोखण्याचा इशारा दिला आहे. तसेच ७ एप्रिल रोजी काढण्यात येणाऱ्या मोर्चात भाजपच्या पुतळ्याचे दहन करणार असल्याचे शेतकरी नेत्यांनी सांगितले. तसेच केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू येथे ३ ते ११ एप्रिल या कालावधीत मृत आंदोलक शेतकरी शुभकरन सिंह यांच्यासाठी श्रद्धांजली सभांचे आयोजन करण्यात येतील, असेही शेतकरी नेत्यांनी सांगितले आहे. अलीकडेच पंजाब सरकारने राज्यातील अनेक बाजार समित्या बंद केल्या आहेत. तर गव्हाचे पिकाची याच मंडईत साठवणूक केली आहे. सरकराचे हे धोरण दारामागून ३ काळ्या कृषी कायद्यांची अंमलबजावणी करण्यासारखे असल्याची टीका देखील शेतकरी नेत्यांनी केली आहे. तसेच शंभू बॉर्डर, खनौरी, डबवली, रतनपुरा सीमेवर आपल्या मागण्यांसाठी हजारो शेतकरी आंदोलन करत असून १० फेब्रुवारीपासून हरियाणात शेकडो शेतकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. यापैकी रविंद्र सिंह, अमरजीत सिंह, अनीश खटकड, नवदीप सिंह आणि गुरकीरत सिंह हे ५ शेकतरी नेते आजही तुरुंगात आहेत.

-----------

### निवडणूक आयोगाची शिवसेना शिंदे गट,

केंद्रीय निवडणूक आयोगाकडे दाखल केली. त्यावर निवडणूक आयोगाने यासंदर्भात शिंदे गटाच्या शिवसेनेला पत्र पाठवित यावर खुलासा मागितला. पण अखेर खुलासा न आल्याने शिवसेना शिंदे गटाने प्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल करून घेतला. यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाने लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर स्टार प्रचारकांची एक यादी जाहिर केली. देशाच्या लोकप्रतिनिधी कायद्यान्वये स्टार प्रचारकांची यादीत फक्त त्याच पक्षाच्या सदस्यांचे नाव असलेल्या व्यक्तीची निवड करता येते. परंतु शिंदे गटाच्या शिवसेना पक्षाकडून जी यादी जाहिर करण्यात आली. त्यात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर घटनात्मक पदावर असलेल्या भाजपाच्या व्यक्तीची नावे स्टार प्रचारकाच्या यादीत जाहिर केली. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आक्षेप घेत उपमुख्यमंत्री अजित पवार हे आणि भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या यादीतील प्रचारक भाजपा आणि शिवसेना शिंदे पक्षाचे सदस्य आहेत का असा सवाल करत स्टार प्रचारकांच्या यादीत अजित पवार आणि भाजपाच्या बड्या नेत्यांचे नाव कसे आणि सरकारच्या इतर घटनात्मक पदावरील व्यक्ती हे शिवसेना पक्षाचे सदस्य आहेत का असा सवाल करत यासंदर्भातील तक्रार मुख्याधिकारी निवडणूक आयोगाकडे दाखल केली. त्यावर मुख्याधिकारी निवडणूक आयोगाने यासंदर्भातील खुलासा करण्याचे पत्र शिवसेना शिंदे गटाच्या सरचिटणीसांना पाठविले. त्यावर शिंदे गटाच्या शिवसेनेने स्टार प्रचारक हे पक्षाचे प्राथमिक सदस्य असल्याचे उत्तर निवडणूक आयोगाला पाठविले. तर दुसऱ्याबाजूला भाजपाने आपल्या स्टार प्रचारकांची यादी निवडणूक आयोगाकडे सादरच केली नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तसेच भाजपाच्या स्टार प्रचारकांची यादी राज्याबरोबर राज्यातील इतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आली नसल्याचा खुलासा मुख्याधिकारी निवडणूक आयोगाने ॲड. प्रांजल अगरवाल यांना दिले आहे.

---------

### तिढा सुटेना, बुधवारचा दिवसही

असा दावा केला होता. मात्र ज्योतीताई मेटे यांच्या नावाचीही जोरदार चर्चा होऊ लागली. ज्योतीताई मेटे यांनीही पत्रकार परिषद घेऊन लढण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यामुळे उमेदवारी नेमकी कोणाला मिळणार याबाबतच्या चर्चा जिल्ह्यात सुरू झाल्या. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतील वरिष्ठ नेत्यांमध्ये दोन मतप्रवाह पडल्याने उमेदवारी निश्चित करायला उशीर लागत आहे. दरम्यान, बुधवारी ज्योतीताई मेटे यांनी मुंबईत शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीमध्ये राजकीय वाटचाली बाबत चर्चा झाल्याचे ज्योतीताई मेटे यांनी सांगितले आहे. शरद पवार यांच्याकडून उमेदवारी जाहीर करण्याबाबत आपल्यालाही प्रतीक्षा असल्याचे त्या म्हणाल्या. बुधवारी शरद पवार आपल्या पक्षाची दुसरी यादी जाहीर करतील आणि त्यात बीडचे नाव असेल अशी अपेक्षा होती मात्र तसे घडले नाही. यामुळे बिडकर यांची प्रतीक्षा आणखी लांबी असून येत्या दोन दिवसात नावाची निश्चिती होण्याची शक्यता आहे.

-----------------

### उद्धव ठाकरे यांच्याकडून कल्याण, हातकणंगले,

केल्याचे ठाकरे म्हणाले. जळगावमधून करण पवार यांना उमेदवारी देत असल्याचे उद्धव ठाकरे यांनी जाहिर केले. जळगांव लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार उन्मेश पाटील यांना डावलून भाजपाने विधानपरिषदेच्या आमदार स्मिता वाघ यांना उमेदवारी जाहिर केली. त्यामुळे नाराज झालेले खासदार उन्मेश पाटील यांनी भाजपाला सोडून शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला. केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या भाजपा पक्षाची खासदारकी सोडून शिवसेना उबाठा गटात प्रवेश केल्या बद्दल शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सध्या देशात एकतर्फी वातावरण असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विरोधकांनी कितीही जनतेच्या मुद्यांना हात घातला तरी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येते. त्यामुळे शिवसेना उबाठा गटातून कोणी गेला की शिवसेना उबाठा गटाला धक्का असे जाहिर पणे सांगितले जाते. पण असल्या धक्क्याने कोलपडून पडणारी शिवसेना नसल्याचे सांगत शिवसेना एकदाच धक्का देते आणि सगळंच बदलून टाकते असे सांगितले. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, या सगळ्या घडामोडींवर उन्मेश पाटील यांनी जे केले त्याला गद्दारी म्हणता येत नाही. पण आमच्याकडे जे झाले ती गद्दारीच आहे. कारण शिवसेनेने अनेकांना मोठे केले. परंतु मोठे झालेल्यांनी तुरुंगात जाण्यापासून स्वतःला वाचविण्यासाठी म्हणून ते तिकडे गेल्याचा आरोप शिंदे गटावर करत त्यातील काही जण काही इतके वाईट नव्हते. पण ते गेले असे सांगताच आता सर्वसामान्य आणि निष्ठावंत शिवसैनिकांना आम्ही आता मोठे करण्याचा निर्णय घेतला असल्याचेही यावेळी सांगितले. यावेळी काही प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी, इतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील उमेदवार कधी जाहिर करणार असा सवाल उद्धव ठाकरे यांना विचारला. त्यावेळी त्यांनी वरील उमेदवारी लगेचच जाहिर केल्या. मुंबईतील उर्वरित राहिलेल्या जागांबाबत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवसेनेने मुंबईतील चार जागांवर आधीच उमेदवार जाहिर केलेले आहेत. परंतु मुंबई उत्तर आणि अन्य एक जागा आमच्या मित्र पक्षांनी लढवावी या दृष्टीने आमची चर्चा सुरु असल्याचेही यावेळी सांगितले. त्याचबरोबर बोरीवली आणि वांद्रेची जागाही मित्र पक्षाने लढवावी अशी इच्छाही यावेळी व्यक्त केली.

-------------

### केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ राष्ट्रवादी

सोनवणे हे, वैयक्तिक मतदार संघातून बालासाहेब पंढरीनाथ बोराडे, बजरंग मनोहर सोनवणे, प्रकाश तुकाराम थोरात, दिलीप रामकृष्ण गुळभिले, नितीन धनराज नेहरकर हे अनुसूचित जाती किंवा जमातीतील सदस्य म्हणून बाळासाहेब एकनाथ निशिगंध, महिला प्रतिनिधीतून विमल श्रीहरी जाधव, वंदना बाळासाहेब जाधव तर विमुक्त जाती भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीयातील सदस्य म्हणून दत्तात्रय येडू ठोंबरे हे तर इतर मागासवर्गीय सदस्य म्हणून दिलीप दत्तात्रय गोरमाळी हे बिनविरोध निवडून आले आहेत. या संचालकांच्या बैठकीत चेअरमनपदी बालासाहेब बोराडे तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीबद्दल बजरंग सोनवणे यांनी दोघांचेही अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

-----------

### बीडच्या तरूणाचा परळीच्या महिलेशी

झालेल्या मैत्रीनंतरआपल्यावर बेतलेल्या प्रसंगाबाबत बीड येथील एका आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे. यातील आरोपी अकबर बबन शेख वय २३ वर्षे रा. तेलगावनाका ईंदिरानगर बीड याने फिर्यादि महिलेशी फेसबुक अकाउन्टवर ओळख करुन घेतली. त्यानंतर सततच्या चॅटिंगमध्ये मैत्री पुढे गेली. विविध प्रकारची माहिती देवाणघेवाण झाली. त्यानंतर आरोपीने गैरफायदा घ्यायला सुरुवात करुन फिर्यादिस ब्लॅकमेल करणे सुरु झाले.आरोपीने फिर्यादिचे राहते घरी शारदानगर परळी वै येथे जावुन फिर्यादिचे ईच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरीक संबंध ठेवले. तसेच दिनांक दिनांक १३/३/२०२४ रोजी फिर्यादिचे पतीला जिवे मारण्याचा प्रयत्न

-------------

### शिवसेना उपजिल्हाप्रमुख

गाडीला गाडी आडवी लावून त्यांना गाडीतून उतरून मारहाण केली असून त्यांना जबर मार लागल्यामुळे त्यांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे समजते. दरम्यान हा हल्ला कशामुळे केला याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आली नाही.

-----------

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले

परिवाराच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. पंकजाताईंच्या प्रचारासाठी आपण आवर्जून बीड येथे सभा घेणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आठवले व मुंडे साहेब यांच्यात अतिशय चांगली मैत्री होती. आमच्या नेहमीच भेटीगाठी व संवाद होतो. मात्र लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मी मुद्दाम त्यांना भेटायला आले. या निवडणुकीसाठी त्यांचे आशीर्वाद घेतले. माझ्या प्रचारासाठी ते आवर्जून येणार आहेत.

cmyk

cmyk

## बीडला परिवर्तनतर्फे भव्य प्रमाणात बालनाट्य शिबिर

बीड :- नाट्य क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या परिवर्तन प्रतिष्ठान तर्फे येत्या १५ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान भव्य प्रमाणात बालनाट्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रसिद्ध नाटककार, दिग्दर्शक व नाट्य प्रशिक्षक डॉ सतीश साळुंके यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली.

परिवर्तन गेल्या ३० वर्षापासून नाट्य क्षेत्रात मोलाची कामगिरी करीत आहे. तर शासनाच्या बालनाट्य स्पर्धेत सतत अकरा वर्षे अंतिम फेरीत प्रवेश मिळून तीन वेळेस राज्यात प्रथम येण्याचा मान परिवर्तनच्या कलावंतांना मिळाला आहे. आजपर्यंत पन्नासपेक्षा जास्त पुरस्कार बालनाट्यासाठी परिवर्तनला मिळाले आहेत. यापूर्वी परिवर्तने त्रेपन्न बालनाट्य शिबिरे आयोजित केली असून अनेक कलावंत त्यात घडले. सदर बालनाट्य शिबिर हे चौपन्नावे आहे. या शिबिरात वक्तृत्व, अभिनय, संभाषणकला, सभाधिटपणा, आवाज व वाणी, व्यक्तिमत्वविकास, शब्दोचारण, भावअभिव्यक्ती, संवादफेक तसेच बालनाटकाविषयीच्या खेळातून स्मरण व कल्पनाशक्तीचा विकास आदी विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरासाठी मर्यादित जागा असून इच्छुकांनी अधिक माहितीसाठी डॉ. सतीश साळुंके, ९४२२२ ९५३५२ या मोबाईलवर संपर्क साधावा. शिबिरासाठी चौथी ते दहावीपर्यंतच्या मुला मुलींना प्रवेश दिला जाणार असून निवडक बालकलावंतांना परिवर्तनच्या नाटकात अभिनय करण्याची संधी दिली जाईल. प्रस्तुत शिबिराचा वेळ सकाळी नऊ ते दुपारी बारा असा असेल. शिबिराचे स्थळ संस्कार विद्यालयाचा हॉल असेल. प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम संधी या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. अधिकाधिक पालकांनी आपल्या पाल्यांना या उन्हाळी बालनाट्य शिबिरात सहभागी करण्याचे आवाहन परिवर्तन प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ४ एप्रिल २०२४



# जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे फोटो संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आदेश

### अनेक वेळा सूचना देऊनही काम पूर्ण न झाल्याने मु.का.अ. पाठक यांची तीव्र नाराजी

**बीड । प्रतिनिधी**

जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजने च्या प्रगतीपथावरील व झालेल्या कामानुसार अंदाजपत्रकात सामविष्ट असलेल्या उपांगाचे फोटो जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तात्काळ अपलोड करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी संबंधित विभागांना दिले असून यापूर्वी अनेक वेळा सूचना देऊनही हे काम न झाल्याने अविनाश पाठक यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.या पत्राची गांभीर्याने दाखल घ्यावी असा इशाराही त्यांनी या पत्रात दिला आहे. गेल्या काही दिवसापासून जलजीवन मिशन अंतर्गत गावागावात नळ पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू आहेत. ही कामे करत असताना या कामाच्या अंदाजपत्रकानुसार उपांगाचा, उपांगनिहाय फोटो संकेतस्थळावर अपलोड करणे हे सरकारने बंधनकारक केले आहे. मात्र अनेक वेळा सूचना देऊनही प्रगतीपथावरील योजनेच्या झालेल्या कामाचे उपांगाचे फोटो संकेतस्थळावर अपलोड केले जात नाहीत. मासिक आढावा बैठकीत अनेक वेळा सूचना देऊनही हे फोटो अपलोड न केल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब गंभीर असून यात संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी, उपअभियंता, विस्तार अधिकारी यांनी लक्ष देऊन पंचायत समिती कार्यक्षेत्रातील ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागामार्फत जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या प्रगतीपथावरील सर्व नळ पाणीपुरवठा योजनांचे उपांगनिहाय फोटो तात्काळ जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करून कारवाईच्या अहवाल तात्काळ जिल्हा परिषदेला आणि पाणीपुरवठा विभागाला सादर करण्यात यावा. यात कुठलाही विलंब चालणार नाही याची गांभीर्याने दक्षता घ्यावी असा इशाराही मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी आपल्या पत्रात दिला आहे. या पत्राचे प्रतिलिपी कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा योजना,वॅपकॉस कंपनी ,नाबार्ड कंपनी यांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. या कामाची जबाबदारी या कामासाच्या देखरेखी साठी नेमलेल्या वॅपकॉस कंपनीची आणि नाबार्ड कंपनीची असून या दोन्ही कंपन्यांचे या कामाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. यावर लक्ष ठेवण्याचे काम कार्यकारी अभियंत्याचे आहे. मात्र ते नेमके कोणते काम करतात. हे सर्वसामान्य जनतेला अद्याप समजलेले नाही. या कंपनीची नेमणूक नेमकी कशासाठी केली आहे. आणि हे काय काम करतात याचेही स्पष्टीकरण संबंधित विभागाकडून मिळत नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राद्वारे गंभीर इशारा दिला असून यापूर्वी कुठलेही काम झाले नसल्याचे या पत्रावरून स्पष्ट होते.

# फेसबुकवरची मैत्री महिलेला आली अंगलट

### मारहाण, अत्याचार व जीवे मारण्याची धमकी

परळी / प्रतिनिधी

फेसबुक वरची मैत्री करून स्वतःच्या जाळ्यात ओढून महिलेवर अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी देण्याचा प्रकार परळी शहरातील एका गृहिणी सोबत घडला असून याप्रकरणी या महिलेच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखत वेगाने तपास करत या प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे

पोलीस सूत्रांकडून पमिळालेल्या माहितीनुसार, परळी शहरातील उच्चभ्रू वस्ती असलेल्या शारदानगर भागातील भाड्याने राहत असलेल्या ३२ वर्षिय महिलेची फेसबुकवर बीड येथील युवकाशी मैत्री जुळली.अकबर बबन शेख (वय २३ वर्षे रा. तेलगाव नाका इंदिरा नगर बीड) असे युवकाचे नाव असून युवकाने महिलेशी फेसबुक अकाउन्टवर ओळख करुन चॅटिंग करण्यास सुरुवात केली सततच्या चॅटिंगमुळे दोघांत मैत्री झाली. विविध प्रकारची माहिती देवाणघेवाण झाली. त्यानंतर आरोपी युवकाने गैरफायदा घ्यायला सुरुवात करुन पीडित महिलेस ब्लॅकमेल करणे सुरु झाले. आरोपीने महिलेच्या राहते घरी शारदानगर परळी वै येथे येऊन महिलेच्या ईच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरीक संबंध ठेवले. तसेच दि १३ मार्च रोजी पीडित महिलेच्या पतीला जिवे मारण्याचा प्रयत्न केला.महिलेला चापटा बुक्याने मारहाण केली.परत दि ०२ एप्रिल रोजी पीडित महिलेच्या घरी कोणी नसताना सकाळी ९.४० च्या सुमारास आरोपी घरी जावुन तु मला फोन करून का बोलत नाहीस असे म्हणुन महिलेशी झटापट करत विनयभंग केला.प्रतीकार करण्याचा प्रयत्न केला असता महिलेस मारहाण करत जखमी केले.

या प्रकरणी पीडित ३२ वर्षीय महिलेच्या फिर्यादीवरून अकबर बबन शेख (वय २३, रा. तेलगाव नाका इंदिरा नगर बीड) याच्या विरोधात परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुरनं ४६/२०२४ कलम ३७६,३५४, ३५४ (), ४५२,३२३,५०६ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे या गंभीर प्रकरणी पिंक पथक अंबाजोगाई च्या पोउपनि प्रतिभा एम. शेटे, संभाजीनगर पोनि शेख, सपोनि प्रविण जाधव, पोअं. भगवान गुट्टे आदींनी पुढील तपास करीत आरोपी अकबर बबन शेख यास अटक केली आहे.

## माजलगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सव सोहळा - २०२४ चे आयोजन दि. ७ एप्रिल २०२४ रोजी दु. २ वा. वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले असुन विवीध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्यांना भिमरत्न पुरस्कार वितरणासह कलारत्न पुरस्काराचे वितरण देखिल करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे, आयोजक युवराज ढगे यांनी दिली आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन खा. प्रितम मुंडे यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्षस्थांनी व्याख्याते विठ्ठल कांगणे यांची उपस्थिती असणार आहे तर प्रमुख उपस्थितीमध्ये आमदार प्रकाश सोळंके, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, मानवी हक्क अभियानचे मिलींद आवाड, आ.भा.मि.महा समितीचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, भाजपा नेते रमेश आडसकर, भाजपा विधानसभा प्रमुख मोहन जगताप, आरपीआय प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, माजी सभापती नितीन नाईकनवरे, आप्पासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. प्रकाश आनंदगांवकर, दयानंद स्वामी, गौतम वैराळे, चंद्रकांत शेजुळ, कल्याण आबुज, धिरजकुमार बच्चु, केतन राठोड, बालक कोळी, उपसभापती श्रीहरी मोरे, सभापती जयदत्त नरवडे, राजेश साळवे, कचरू खळगे, विवेक पोटभरे यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमात भिमरत्न पुरस्कार दिपक केदार, अजिंक्य चांदणे, सचिन साठे, साकी गायकवाड, उमेश पोखरकर, प्रदिप थोरात, दिपक थोरात, बालाजी मारगुडे, तुकाराम येवले, डॉ. दिनकर मस्के, सचिन कागदे, किशोर कांडेकर, नारायण भले यांचेसह अनेकांना देण्यात येणार आहे तर राम जगताप, विक्रम आलाट, अर्जुन आंबेकर, जानू धनेगावकर यांना कलारत्न पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असुन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे, आयोजक युवराज ढगे यांनी केले आहे.

# भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या वतीने इफ्तार पार्टी संपन्न

### ज्ञानेश्वर सरवदे यांनी दिला इफ्तार पार्टीतुन मुस्लीम-हिंदू एकतेचा संदेश

**माजलगाव । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्या निमित्त मुस्लिम समाज बांधवांना भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे यांनी दि ०२ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होती यावेळी मोठ्या संख्येने मुस्लीम-हिंदू बांधवांची उपस्थीती असल्याने यावेळी इफ्तार पार्टीच्या माध्यमातून मुस्लीम -हिंदू एकतेचा संदेश देण्यात आला.



मुस्लीम बांधवांसाठी पवित्र रमजान महिन्यात रखरखत्या उन्हात कोणत्याही प्रकारचे अन्न पाणी न घेता कडक उपवास करण्यात येतात,आणी सायंकाळी ते उपवास सोडतात.या मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्या निमित्त भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राहुल केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे यांनी माजलगाव येथे दि ०२ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी मुस्लीम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.या इफ्तार पार्टीत मुस्लीम बांधवां बरोबरच हिंदू बांधवांना एकत्र आणत मुस्लीम व हिंदू बांधवांही मोठ्या प्रमाणात इफ्तार पार्टीत सहभागी झाल्याने या इफ्तार पार्टीतुन मुस्लीम -हिंदू एकतेचा संदेश देण्यात आला.

या इफ्तार पार्टीत माजी नगराध्यक्ष नासेर पठाण,माजी नगरसेवक खलील पटेल,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके, ईश्वर खुर्प, राजु भाई पठाण,एम.आय.देशमुख,नवाब पटेल,लाला आतार,फिरोज इनामदार,शेख जीलशाद,फारुख भाई,रहेमत मुल्ला,फैसल चाऊस,दत्ता नाईकनवरे,अनंत शेंडगे,अतुल उगले,इद्रीस मौलाना, बाळासाहेब क्षिरसागर, अविनाश कांडुरे,तात्या पांचाळ यांच्यासह मोठ्या प्रमाणावर मुस्लीम व हिंदू बांधवांची उपस्थीती होती.

## धनलक्ष्मी पतसंस्थेच्या कोळगाव शाखेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा



**तांदळा । प्रतिनिधी**

धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या कोळगाव शाखेचा दुसरा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कोळगावचे ज्येष्ठ नागरिक तथा माजी उपसरपंच लक्ष्मणदादा हिंदोळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, धनलक्ष्मी पतसंस्थेने अल्पावधीतच पारदर्शक कारभाराने ग्राहकांचा विश्वास संपादन करून प्रगतीची गरुड भरारी घेतली आहे. गरजूंना आर्थिक मदतीचा हात देऊन स्वावलंबी बनवण्यासाठी या पतसंस्थेने पुढाकार घेतला असून या पतसंस्थेचा नावलौकिक उत्तरोत्तर वाढत जावो अशा शुभेच्छा देखील हिंदोळे दादा यांनी शेवटी व्यक्त केल्या. तसेच धनलक्ष्मी पतसंस्थेच्या पारदर्शक कामावर कोळगाव तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी जो विश्वास टाकला, तो विश्वास धनलक्ष्मी पतसंस्थेच्या अध्यक्ष तसेच संचालकांनी सार्थ ठरविला असल्याचे ज्येष्ठ नागरिक रमेशराव लोंढे यांनी बोलताना सांगितले.

## औष्णिक विद्युत केंद्र संच क्र.९ चे काम सुरू करण्याची मागणी

**परळी । प्रतिनिधी**

येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात नवीन संच क्रमांक ९ सुरू करण्यासाठी शासनाने संच क्रमांक ८ च्या वेळी जमिन संपादित केली असून संच क्रमांक ८ कार्यान्वित झाला आहे. मात्र संच क्रमांक ९ च्या कामाला अद्यापही सुरुवात झाली नाही ती सुरू करण्यासाठी परळीऔष्णिक विद्युत प्रकल्प बचाव कृती समितीच्या वतीने येथील बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता डॉ अनिल कोठये व उपविभागीय अधिकारी श्री. अरविंद लाटकर यांना निवेदन देण्यात आले आहे.

येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात सध्या संच क्रमांक ६,७,८ हे कार्यान्वित आहेत. या तीन संचातून ७५० मेगावॅट विज निर्मिती केली जाते. येथील संच क्रमांक १ ते ५ बंद करुन स्क्रॅपमध्ये काढण्यात आले आहेत.२००७ मध्ये औष्णिक विद्युत केंद्र संच ८ व ९ साठी १२८ हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. यातील संच क्रमांक ८ चे काम पूर्ण होवून २०१६ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे. परंतु संच क्र. ९ चे काम अद्याप सुरू झालेले नाही. हा संच सुरू झाल्यास परळीतील अनेक बेरोजगार तरुणांना कायमस्वरुपी रोजगार मिळू शकतो.

यासाठी परळी औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्प बचाव कृती समिती स्थापन करण्यात आली असून समितीच्या अध्यक्षपदी भगवान साकसमुद्रे, सचिव अँड.मनोज संकाये यांची निवड करण्यात आली आहे.

# सादोळा येथील अवैध वाळू तस्करीच उत्खनन थांबवणार कोण?

### माजलगावचे तहसीलदार व महसूल अधिकारी डोळे झाकून गप्प का?

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

तालुक्यातील सादोळा येथील गोदावरी नदीतुन अवैध वाळू उत्खनन चालू आहे. संबंधित महसूलच्या अधिकाऱ्यांना अनेक वेळा सूचना देऊनही अवैध वाळू तस्करी थांबात नाही याचं गोड बंगाल काय? असा सवाल सादोळा येथील ग्रामस्थांना पडला आहे.

माजलगाव तालुक्यामध्ये वाळूचे अधिकृत एकही टेंडर चालू नाही तरीही वाळू तस्करांनी थैमान घातले आहे.याकडे माजलगाव तहसीलदार व महसूल विभागाने अधिकारी अर्थपूर्ण डोळे झाक करतात का? अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या वाळुमाफियावर कारवाई होत नाही याचं नेमके गोडबंगाल काय? असा प्रश्न गावातील नागरिकास पडला आहे.शासनाने माजलगाव तालुक्यात अद्याप पर्यंत एकही वाळूचे अधिकृत टेंडर नाही मात्र अवैध वाळू तस्करी मोठ्या प्रमाणात होत आहे,मात्र याकडे माजलगाव तहसीलदार व महसूल विभागाचे अधिकारी यांच्या निदर्शनास येत नाही एक का? एक तर वाळूमाफीकडून माजलगाव तहसील तथा महसूल विभागाला मोठ्या प्रमाणात अवैध महसूल मिळत असावा किंवा सदर वाळू तस्कर मोठ्या राजकारणातील हितचिंतक असावा याशिवाय तहसीलदार किंना महसूल प्रशासन गप्प बसत नाही अशी चर्चा अशी सादोळा ग्रामस्थांसह संपूर्ण माजलगाव तालुक्यात चालू आहे.माजलगाव तालुका अनेक प्रकरणात गाजत आहे अवैध वाळू तस्करी,अवैध धंदे असतील या प्रकरणाला आळा घालणारा कोणी वाली आहे का नाही असा प्रश्न माजलगाव तालुक्यातील जनतेला पडला आहे प्रशासन अवैध वाळू तस्कर किंवा अवैध धंदेवाले यांना जर आवर घालू शकले नाहीत तर माजलगाव महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्या विरोधात मोठे आंदोलन उभा करावी लागेल अशी चर्चा सर्वसामान्या नागरीकांतून व्यक्त केली जात आहे.

> **रात्री आणी दिवसा वाळू माफिया सादोळा येथून बिनधास्तपणे अवैध वाळु तस्करी चालू असून मी अनेक वेळा पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांना वारंवार सांगून सुद्धा कारवाई करण्यात आली नाही.अखेर मला ना-ईलाजास्तव त्यांना लेखी स्वरूपात निवेदन सुद्धा दिलेले आहे परंतु महसुल व पोलीस प्रशासनाने सदर अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर अद्याप पर्यंत कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.**
>
> **- ऋतिक सोळंके**




## अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने वर्ष अखेरीस ५१५ कोटींच्या ठेवी जमा करत ६.३१ कोटी रुपयांचा मिळवला करपूर्व नफा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२३-२०२४ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२४ अखेर बँकेने

५१५ कोटींच्या ठेवी जमा केल्या असून एकूण ६.३१ कोटींचा करपूर्व नफा होऊन त्यातून कर वजा जाता रुपये ४.२१ कोटींचा निव्वळ नफा मिळवला असल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी प्रसिध्दी पत्रकात जाहीर केले आहे. यामध्ये गत वर्षाच्या तुलनेत तब्बल १५ कोटीची वाढ झालेली आहे.वर्ष अखेरीस बँकेची एकूण सभासद संख्या ही १२०४१ एवढी असून तसेच मार्च २०२४ अखेर ग्राहकांच्या साठी बँकेचे कर्ज व्यवहार रु.३२७ कोटी इतके झाले आहे. या आर्थिक वर्षात बँकेचे रु.१८ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रु .४४ कोटी ४८ लाख एवढा आहे. त्यासोबतच बँकेची एकूण गुंतवणूक रु २२३ कोटी एवढी असून ३१ मार्च २०२४ अखेर बँकेकडे एकूण ठेवी रु. ५१५ कोटी इतक्या झाल्या आहेत . यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १५ कोटी रुपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. या सर्व आर्थिक व्यवहारामुळे बँकेने ३१ मार्च २०२४ अखेर रुपये ४.२१ कोटी इतका निव्वळ नफा मिळवला असल्याचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

वर्षभरात सर्व क्षेत्रातील परिस्थिती पाहता बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच कर्जदार,ठेवीदार, सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे सांगितले आहे मार्च २०२४ अखेरील बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून हे यश बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची पावती असल्याचे देखील मोदी यांनी यामध्ये नमूद केले आहे. आर्थिक वर्षात अनंत अडचणी येऊनही बँकेच्या वसुली विभागाने समाधानकारक काम करत बँकेचा निव्वळ एनपीए ०% टक्के राखण्यात बँकेस यश मिळाले आहे . नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेच्या दोन नवीन शाखांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजी नगर येथील सातारा परिसर येथे राज्याचे उपमुख्यमंत्री मा ना अजितदादा पवार यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.. तर अंबाजोगाई शहरातील तिसऱ्या शाखेचा डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, चौसाळकर कॉलनी येथे नांदेड येथील गोदावरी मल्टिस्टेट च्या संस्थापिका श्रीमती राजश्री हेमंत पाटील यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. चालू आर्थिक वर्षात रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने आणखीन नवीन शाखांचा शुभारंभ करण्याचा मानस देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.



देशातील आर्थिक परिस्थिती तसेच वाढती महागाई अशा अवघड परिस्थिती देखील कर्जधारक, ग्राहकांचा विचार करुन बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक व मजबूत ठेवण्यात यश मिळवले असल्याचे मत बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी यांनी व्यक्त केले. बँकेचे सर्व सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे सन २०२३ - २०२४ मध्ये चांगले कामकाज करणे शक्य झाले आहे. अशीच कामगिरी पुढील आर्थिक वर्षातही कायम ठेवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल असा आशावाद बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केला आहे. चालू आर्थिक वर्षात अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या वतीने अर्थकारणासोबतच नानाविध असे सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेस साजेसे असे उपक्रम राबविले आहेत.या उपक्रमाद्वारे बँकेच्या ग्राहकांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर तर उंचावलाच असून त्याचबरोबर कुटुंबाचा सामाजिक स्तर देखील तेवढ्याच उंचीवर गेल्याचे समाधान देखील याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी पत्रातून व्यक्त केले आहे. बँकेच्या माध्यमातून संपन्न झालेल्या उपक्रमात प्रामुख्याने शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबिर याबरोबरच बँकिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन अशा अनेक कार्यक्रमाचा समावेश असून यापुढेही अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या ग्राहक, सभासद व ठेवीदार यांचे हित जोपासत सर्व संचालक मंडळाच्या साथीने बँकेचा आर्थिक व्यवहार हा अतिशय पारदर्शी किंवा ग्राहकांना कुठलेही आमिष किंवा प्रलोभने न देता बँकेच्या वतीने सुस्पष्ट असा व्यवहार होईल असा विश्वास बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा सर्व संचालकांच्या वतीने देण्यात आला. त्याचबरोबर सामान्य माणूस हाच केंद्रबिंदू मानून व त्याचे हित लक्षात घेऊनच यापुढेही बँक आपला कारभार करेल असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

## सेवानिवृत्तीनंतर समाज उन्नतीसाठी कार्य करणे महत्त्वाचे- नवनाथ थोटे

**बीड । प्रतिनिधी**

एखादा शिक्षक सेवेतून निवृत्त झाल्यानंतर सामाजिक आणि राष्ट्रीय उन्नतीसाठी उर्वरित आयुष्यात काम करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन माऊली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष नवनाथराव थोटे यांनी श्रीमती अनुराधा वसंतराव काळे यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमात बोलताना केले. माऊली विद्यापीठ केज संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम महाविद्यालयातील शिक्षिका श्रीमती अनुराधा वसंतराव काळे या ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले त्यांच्या सेवापूर्ती सन्मान सोहळ्यानिमित्त नवनाथ राव थोटे बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की शिक्षक हा कायम सामाजिक कर्तव्य बजावणारा प्रमुख घटक असून तो जरी




सेवानिवृत्त झाला तरी सामाजिक, राष्ट्रीय उन्नतीसाठी त्याने उर्वरित आयुष्यात कार्यरत रहावे असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी श्रीमती अनुराधा काळे यांनी संस्थेचे अध्यक्ष अशोकराव पाटील सचिव खा. सौ.रजनीताई पाटील, आदित्य पाटील यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य मधुकर काळे हे होते. त्यांनी श्रीमती काळे यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आनंत इंगळे यांनी केले .यावेळी प्रा. शिवाजी खांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नंदा यलम यांनी तर आभार प्रा. सतीश स्वामी यांनी मानले .या कार्यक्रमाला माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# संयुक्त अरब अमिरातीला अतिरिक्त १० हजार टन कांद्याची निर्यात

पुणे : कांदा निर्यात बंदी जैसेथे असतानाच केंद्र सरकारने संयुक्त अरब अमिरातीला (युएई) कांदा निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत वाणिज्य मंत्रालयाने अधिसूचना काढली असून अतिरिक्त १० हजार टन कांदा निर्यात करण्यास मान्यता दिली आहे. याआधी वाणिज्य मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, केंद्र सरकारने ६४,४०० टन कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली होती.

दरम्यान देशातील कांद्याच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी ८ डिसेंबर २०२३ रोजी सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. तसेच ३१ मार्चपर्यंत कांद्याची निर्यात बंदी कायम राहील, असे स्पष्ट केले होते. पण लोकसभा निवडणुका घोषित झाल्यानंतर वाणिज्य मंत्रालयाने २२ मार्चला अधिसूचना काढत कांद्यावरील निर्यातबंदी पुढील सूचनेपर्यंत अशीच राहिल असे जाहीर केले. वाणिज्य मंत्रालयाने बुधवारी (ता. ०३) कांदा निर्यातीबाबत अधिसूचना काढली. यात युएईला अतिरिक्त १० हजार टन कांदा निर्यात केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. तसेच ही निर्यात नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड मार्फत करण्यात येईल, असेही अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. तर याआधी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांच्या समितीने (१८ फेब्रुवारी २०२३) कांद्याच्या निर्यातीला मंजुरी दिली होती. याप्रमाणे केंद्र सरकारने ३ लाख मॅट्रिक टन कांदा निर्यातीला मंजूरी दिली.



**कांदा निर्यात करण्यास परवानगी**

वाणिज्य मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, भारत सरकारने नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड मार्फत संयुक्त अरब अमिराती आणि बांगलादेशला ६४,४०० टन कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली होती. यात भूतानला ५५० टन, बहरीनला तीन हजार टन, मॉरिशसला १२०० टन, बांगलादेशसाठी ५०,००० टन, संयुक्त अरब अमिरातीला १४,४०० टन कांदा निर्यातीला परवानगी देण्यात आली होती. यात आता अतिरिक्त १० हजार टन कांदा निर्यात होणार आहे.

**५ लाख टन कांदा खरेदीचे निर्देश**

तसेच रब्बी हंगामातील कांद्याच्या होणारी अवक लक्षात घेऊन सरकारने एनसीसीएफ आणि नाफेड या सरकारी एजन्सीजला शेतकऱ्यांकडून ५ लाख टन कांदा खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कांदा खरेदी करण्यासाठी दोन्ही एजन्सीजना प्रथम कांदा उत्पादत शेतकऱ्यांची नोंदणी करावी लागणार आहे. तर कांदा खरेदीपोटीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

## दहा लाख टन साखर निर्यातीस परवानगी द्या



### इस्माची केंद्राकडे मागणी

पुणे : यावर्षीच्या गाळप हंगामाच्या सुरुवातीला देशातील साखर उत्पादन, मागील वर्षीच्या तुलनेत कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, आता हंगामाच्या शेवटी महाराष्ट्र, कर्नाटकसह देशातील साखर उत्पादनात काहीशी वाढ होणार आहे. ज्यामुळे चालू गाळप हंगामात १० लाख टन साखर निर्यातीस परवानगी देण्यात यावी. अशी मागणी देशातील साखर कारखान्यांची शिखर संस्था असलेल्या इंडियन शुगर मिल्स एसोसिएशनने (इस्मा) केंद्र सरकारकडे केली आहे.

देशात साखर निर्यातीस पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. प्रामुख्याने यावर्षी साखर उत्पादन घटणार असल्याने, हा निर्णय ३१ ऑक्टोबर २०२३ नंतर देखील कायम ठेवण्यात आला होता. मात्र, आता महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत चांगले साखर उत्पादन नोंदवले गेले आहे. ज्यामुळे देशपातळीवर साखर उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे. याच पार्श्वभूमीवर इंडियन शुगर मिल्स एसोसिएशनने वाणिज्य मंत्रालयाच्या सचिवांना पत्र लिहीत चालू गाळप हंगामात १० लाख टन साखर निर्यातीस परवानगी देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

**९७ लाख टन साखर साठा अतिरिक्त :**

इंडियन शुगर मिल्स एसोसिएशनने वाणिज्य मंत्रालयाला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, चालू वर्षीच्या गाळप हंगाम सुरु होण्यापूर्वी १ ऑक्टोबर २०२३ रोजी ५६ लाख टन साखरेचा साठा शिल्लक होता. प्रामुख्याने देशाची वार्षिक साखरेची मागणी २८५ लाख टन इतकी आहे. तर इथेनॉल निर्मिती वगळता देशभरात चालू हंगामात साखरेचे निव्वळ अंदाजे उत्पादन ३२० लाख टन उत्पादन होण्याची शक्यता आहे. अर्थात यंदा ९७ लाख टन साखरेचा साठा अतिरिक्त असणार आहे. ज्यामुळे सध्याच्या घडीला किमान १० लाख टन साखर निर्यातीस परवागी दिली जावी. जेणेकरून कारखान्यांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांची रक्कम वळती कर यास मदत होईल, असेही इस्माने आपल्या पत्रात म्हटले आहे.

## शेतकऱ्यांसाठीच्या अपघात विम्याच्या १०५० दाव्यांना मंजुरी!

### स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ठरतेय उपयुक्त

पुणे : राज्यातील शेतकऱ्यांचा अपघात झाल्यास किंवा त्यांना अपंगत्व आल्यास, त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी राज्य सरकारकडून गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबवली जात आहे. या योजनेच्या आणखी १ हजार ५० शेतकऱ्यांच्या दाव्यांना राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता या सर्व मंजूर दाव्यापोटी शेतकऱ्यांना २० कोटी ७८ लाख रुपयांचे अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.




राज्यातील शेतकऱ्यांना काही कारणास्तव अपंगत्व येते तर कधी-कधी मृत्यू देखील ओढवतो. अशावेळी संबंधित शेतकऱ्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. शेतकरी कुटुंबात कर्ता पुरुषच नसेल किंवा अपंग असेल. तर त्या शेतकरी कुटुंबाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा अपंग किंवा मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना सरकारच्या वतीने आर्थिक मदत देता यावी. या हेतूने राज्य सरकारकडून स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील अपघाती मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना दोन लाख रुपये, तर अपंगत्व आलेल्या शेतकरी कुटुंबाला १ ते २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत दिली जाते.

**कोणाला मिळते मदत?**

शेती करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कधी वन्य प्राणी तर कधी नैसर्गिक संकटांच्या वेळी शेतकऱ्यांना शेतात काम करावे लागते. परिणामी अंगावर वीज पडणे, महापूर या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी मृत्युमुखी पडतात. याशिवाय शेतामध्ये काम करणे तितकेसे सोपे नसते. सर्पदंश, विंचूदंश यामुळे देखील शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवतो. तर शेतीत काम करताना विजेशी खेळावे लागत असल्याबने शेतकऱ्यांना अचानक विजेचा शॉक बसून, अनेक शेतकऱ्यांना आपले प्राण गमवावे लागतात.

इतकेच नाही तर शेती कामानिमित्त किंवा अन्यही वेळी कुठे बाहेर गेल्यास रस्त्यावरील अपघात, वाहन अपघातात देखील शेतकऱ्यांचा मृत्यू होतो. या आणि अन्य सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास, संबंधित शेतकऱ्यांच्या कुटुंबांना सरकारकडून सानुग्रह अनुदान दिले जाते.

## शेळ्यांच्या शिफारस केलेल्या तीन विशेष प्रजाती

राज्यात शेतीला जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसाय झपाट्याने वाढत आहे. विशेष म्हणजे शेळीपालन करण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध व्हावे. यासाठी शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध योजना राबविल्या जात आहे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांना राष्ट्रीय ग्रामीण विकास बँकेकडून (नाबार्ड) कर्ज स्वरूपात आर्थिक मदत देखील उपलब्ध करून दिली जात आहे. इतकेच नाही तर केंद्रीय पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाकडून देखील शेळीपालन व्यवसायाला विशेष प्रोत्साहन दिले जात आहे.

अलीकडेच केंद्र सरकारकडून देशातील तीन विशेष प्रजातींच्या शेळ्यांबद्दल माहिती जारी करण्यात आली आहे. यामध्ये सिरोही, उस्मानाबादी आणि संगमनेरी या प्रजातीच्या शेळ्यांबद्दल माहिती देण्यात आली आहे. शेळीपालन तज्ज्ञांच्या मते, देशातील या तीनही शेळ्यांच्या प्रजाती मांस उत्पादनासाठी पाळल्या जातात.

यातील सिरोही ही शेळी मूळची राजस्थानची प्रजाती आहे. तर उस्मानाबादी आणि संगमनेरी या प्रजातीच्या शेळ्या महाराष्ट्रात आढळतात. विशेष म्हणजे या तिन्ही प्रजातीच्या शेळ्यांच्या मांसाला मोठी मागणी आहे. प्रामुख्याने पश्चिम बंगालमध्ये दुर्गा पूजेच्या वेळी या शेळ्यांच्या मांसाला खूप मागणी असते.



शेळयांच्या तीन विशेष प्रजाती : १. सिरोही शेळी : सिरोही प्रजातीच्या शेळ्यांचा रंग तपकिरी आणि पांढऱ्या रंगाचे मिश्रण असते. या शेळ्यांच्या अंगावरील केस दाट व लहान असतात. शेळी आणि बोकड या दोघांची शरीरे मध्यम आकाराची असतात. या प्रजातीच्या शेळीचे शेपूट वक्र असून, अंगावर दाट केस असतात. तसेच या शेळीचे शिंगे लहान व तीक्ष्ण आणि मागे वळलेली असतात. या शेळीच्या बोकडाचे सरासरी वजन ५० किलो असते आणि शेळीचे वजन २३ किलो असते. जन्माच्या वेळी लहान बकराचे सरासरी वजन दोन किलोग्रॅमपर्यंत असते. या जातीच्या शेळ्या वर्षातून एकदा दोन पिल्लांना जन्म देतात.

२. उस्मानाबादी शेळी : उस्मानाबादी जातीची शेळी ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यासह लातूर, तुळजापूर आणि उदगीर भागात आढळते. या प्रजातीच्या शेळ्या आकाराने मोठ्या असतात. या जातीच्या शेळ्या ७३ टक्केपर्यंत पूर्णपणे काळ्या रंगाच्या असतात. तर २७ टक्के पांढरे आणि तपकिरी रंगाचे डाग असतात. उस्मानाबादी शेळी ही दूध आणि मांस दोन्हीच्या उत्पादनासाठी पाळली जाते. या जातीच्या शेळीचा दूध देण्याचा कालावधी चार महिन्यांचा असतो. या जातीच्या शेळ्या दररोज अर्धा ते दीड लिटरपर्यंत दूध देतात. या प्रजातीची शेळी वर्षातून दोनदा दोन पिलांना जन्म देते. या जातीच्या एका शेळीपासून ४५ ते ५० किलोपर्यंत मांस मिळते.

३. संगमनेरी शेळी : शेळीची ही संगमनेरी जात साधारणपणे महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये आढळते. या जातीच्या शेळ्या या मध्यम आकाराच्या असतात. संगमनेरी शेळ्यांचा रंग एकसारखा नसतो; पांढऱ्या, काळ्या किंवा तपकिरी व्यतिरिक्त, इतर रंगांचे डाग देखील आढळतात. या जातीच्या शेळयांचे कान खालीच्या बाजूने वाकलेले आहेत. या जातीच्या शेळी आणि बोकडांची दोन्ही शिंगे मागच्या बाजूला झुकलेली असतात. संगमनेरी जातीची शेळी दिवसाला अर्धा ते एक लिटर दूध देते. ते आपल्या प्रजनन काळात एकूण १६५ दिवस दूध देते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८२ : ब्रिटन च्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्राम ईस्ट लंडन मध्ये चालू झाल्या .
१९४४ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश व अमेरिकन फौजांनी रुमानियातील बुखारेस्टवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ३००० नागरिक ठार झाले.
१९४९ : पश्चिम युरोपातील अकरा देश आणि अमेरिका अशा १२ देशांनी संरक्षणविषयक सामंजस्य करार करुन 'नाटो'ची स्थापना केली.
१९४९ : पश्चिम युरोपातील राष्ट्रे व अमेरिका यांच्यात संरक्षणविषयक उत्तर अटलांटिक करार म्हणजे 'नाटो करार' करण्यात आला.
१९६८ : 'नासा'ने 'अपोलो-६' चे प्रक्षेपण केले.
१९६८ : मेम्फिस, टेनेसी येथे जेम्स अर्ल रे याने मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) यांची हत्या केली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२३ : सर कार्ल विल्हेम सिमेन्स जर्मन/ब्रिटिश विद्युत अभियंता, अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारी 'सिमेन्स' ही बलाढ्य कंपनी त्याच्याच भावाने स्थापन केली आहे. (मृत्यू: १९ नोव्हेंबर १८८३)
१८४२ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (मृत्यू: ३ आक्टोबर १८९१)
१८९३ : पायोनियर इन्स्ट्रुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९८५)
१९०२ : पं नारायणराव व्यास ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (मृत्यू: १ एप्रिल १९८४)
१९०६ : फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे स्थापक एवेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
१९३३ : रामचंद्र गंगाराम तथा 'बापू' नाडकर्णी डावखुरे मंदगती गोलंदाज
१९७३ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१७ : जॉन नेपिअर स्कॉटिश गणितज्ञ, लॉगॅरिथम सारणीचे जनक (जन्म: ? ? १५५०)
१९२३ : जॉन वेन ब्रिटिश गणितज्ञ (जन्म: ४ ऑगस्ट १८३४)
१९३१ : आंद्रे मिचेलिन फ्रेन्च उद्योगपती (जन्म: १६ जानेवारी १८५३)
१९६८ : मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) कृष्णवर्णीयांचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अमेरिकेतील मानवी हक्क कार्यकर्ते आणि नोबेल पारितोषिक विजेते यांची हत्या (जन्म: १५ जानेवारी १९२९)
१९७९ : पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान झुल्फिकार अली भूट्टो यांना फाशी (जन्म: ५ जानेवारी १९२८)
१९८७ : सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन तथा 'अज्ञेय' ज्ञानपीठ पारितोषिक (१९७८) व साहित्य अकादमी पुरस्कार (१९६४) विजेते हिन्दी लेखक व वृत्तपत्रकार (जन्म: ७ मार्च १९११- खुशीनगर, देवरिया, उत्तर प्रदेश)
१९९६ : आनंद साधले संस्कृत वाङ्मयातील अनेक ग्रंथांचा मोठ्या रसाळ पद्धतीने मराठीत परिचय करुन देणारे साहित्यिक (जन्म: ५ जुलै १९२०)
२००० : वसंतराव कृष्णाजी गोंधळेकर कलादिग्दर्शक (जन्म: )
२०१६ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. ए. संगमा यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९४७)

## म्हैसूरची 'अमृतमहल' गाय; जाणून घ्या वैशिष्ट्ये!



भारतात वेगवेगळ्या भागात गायींच्या जाती प्रसिद्ध आहेत. काही जाती दूध उत्पादनासाठी तर काही शेत कामासाठी उपयुक्त ठरतात. परंतु काही अशाही जाती आहेत ज्या दोन्ही कामासाठी वापरल्या जातात. अशाच एका गायीच्या जातीबद्दल आपण आज जाणून घेणार आहोत. ही गाय आहे 'अमृतमहल'. मूळची म्हैसूरची असणारी ही गायीची जात दूध उत्पादन आणि शेती कामासाठी सुद्धा वापरली जाते. ही प्रजाती 'हल्लीकर' या प्रजातीपासून निर्माण झालेली आहे. या भारतीय गोवंशामध्ये बदलत्या वातावरणामध्ये तग धरून राहण्याची क्षमता चांगली आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने या देशी गायीच्या दुधाची किंमत जास्त आहे. या गायीचे सरासरी आयुष्य १८ ते २० वर्षे असते.

शारिरीक वैशिष्ट्ये : या गायीचा रंग पांढरा, राखाडी असतो. काही गायी नुसत्या पांढर्या किंवा राखाडी रंगाच्या असतात. गायीचे शिर, सरळ व लांब आकाराचे असते. कान मध्यम व टोकदार असतात. शिंगे धारदार आणि टोकदार असतात. प्रौढ गायीचे वजन ३१५ किलो, तर प्रौढ नराचे वजन ५०० किलोपर्यंत असते.

उत्पादन क्षमता : या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय ३६ ते ७२ महिने आहे. गायीचा दूध देण्याचा कालावधी ७ ते १० महिन्यांचा असून एका वेतात ५७२ लिटरपर्यंत दूध देतात. दिवसाकाठी ४ लिटर पर्यंत दूध देण्याची क्षमता या गायीत आहे.

मिलेटरी बैल म्हणून ओळख : या जातीमध्ये प्रचंड ताकद असते. विलक्षण चपळाई व कामामध्ये सातत्य असलेला या जातीच्या बैलांची ब्रिटीशांच्या काळात मिलेटरी बैल म्हणून ओळख परिचित होती कारण सैन्याच्या तोफा वाहून नेणे, आरमाराचे अवजड सामान अडचणीचे जागी वाहून नेणे, लांब पल्ल्याची वाहतूक कमीत कमी वेळात करणे. इ. कामे हे बैल करत असत. सध्या बाजारात देशी गायीच्या दुधाची मागणी वाढत आहे. त्यामुळे जातिवंत दुधाळ गायीची निवड, योग्य पैदास धोरण आखून करणे गरजेचे आहे.

# ग्रामीण भागातील स्मार्ट अंगणवाडी कागदावरच

## डिजिटल शिक्षण, शुद्ध पिण्याच्या पाण्याची वानवा ; अनावश्यक खर्च सुरूच

बीड । प्रतिनिधी

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते. ई-लर्निंगची सुविधा,एलईडी टीव्ही, जलशुद्धीकरण यंत्र,युएसबी पोर्टल अशी अद्यावत उपकरणे आणि सुविधांनी सुसज्ज अशी स्मार्ट अंगणवाडी तयार करण्याची राज्य सरकारची योजना आहे मात्र स्मार्ट अंगणवाडी प्रकल्प कागदावरच राहिला असुन कंत्राटदार पोसण्यासाठी मात्र अनावश्यक गोष्टींवर मात्र भरमसाठ खर्च होताना दिसुन येत आहे. त्यामुळे स्मार्ट अंगणवाड्यांवर होणारा खर्च केवळ कंत्राटदार पोसण्यासाठीच आहे का??असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.



एकात्मिक बाल विकास सेवा, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबवली जाते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्ष वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे.या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे.या अंगणवाड्यांची स्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने आदर्श अंगणवाडीची घोषणा केली होती.यातुन प्रत्येक जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्मार्ट सुविधा देण्यात येणार आहेत. स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये वाटर प्युरिफायर,सिलिंग फॅन, ई-लर्निंग साहित्य, अंगणवाडी अंतर्गत व बाह्य रंगकाम, बोलक्या भिंती,छत दुरुस्ती व डागडुजी, दरवाजा व खिडक्या दुरुस्ती, लायब्ररी कपाट आदि सुविधा देण्याचे शासनाचे धोरण आहे.

स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई -लर्निंग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वॉटर प्युरिफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठा नसल्याने केवळ धुळखात पडुन आहेत मात्र कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वॉटर प्युरिफायर याचा पुरवठा करण्यात आला असुन लाईटफिटींग सुद्धा केली आहे मात्र वीजअभावी शोभेची वस्तू बनुन राहिल्या आहेत.


कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्यांच्या दुरावस्थेचा प्रश्न ऐरणीवर असुन मोडकळीस आलेल्या भिंती आणि पावसाळ्यात गळणारे पत्रे यामुळे चिमुकले, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या सुरक्षेचा यक्षप्रश्न उभा राहिला असुन प्राथमिक सुविधा नसणा-या बीड जिल्ह्यातील १३०० अंगणवाड्या ईमारतीविनाच समाज मंदिरात अथवा उघड्यावर झाडाखाली भरत आहेत.त्यामुळे संबंधित अंगणवाड्यांची दुरुस्ती आणि पुन:बांधणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष लेखी निवेदनाद्वारे केली होती.त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता परंतु अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नाही.

# बीडमध्ये संभाजी भगतांचा शाहिरी जलसा

## कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

ख्यातनाम शाहीर संभाजी भगत यांचा बीडमध्ये शाहिरी जलसा आयोजित करण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये १ एप्रिलपासून १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने येत्या रविवार (दि.७) एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महत्वाची भूमिका पार पाडणारे विद्रोही शाहिर संभाजी भगत यांचा विद्रोही आंबेडकरी शाहिरी जलसा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विश्वात साजरी होते. बीड येथील आंबेडकरी जनता स्वबळावर जयभिम महोत्सव साजरा करत आलेली आहे. यावर्षीही अतिशय परिवर्तनिय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे बीडचा जयभिम महोत्सव राज्यात एक आदर्श महोत्सव म्हणून ओळखला जातो. या जयभिम महोत्सवात साजरे होणारे कार्यक्रम सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. महोत्सव हा केवळ सांस्कृतिक नसून समाज बदलाचा महत्वपूर्ण टप्पा आहे. या भूमिकेतून शाहिर संभाजी भगत यांचा विद्रोही आंबेडकरी शाहिरी जलसा बीडमध्ये होतो आहे. या कार्यक्रमास जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

# शिरूरची शिवानी गाडेकर पाटील बनली डॉक्टर

शिरूर । प्रतिनिधी

येथील रहिवासी कु.शिवानी गोविंद गाडेकर पाटील हिला चोवीसाव्या वर्षी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्रमाणपत्र शुक्रवारी दिक्षांत समारोहात प्रदान करण्यात आले.बारावी नंतर वैद्यकीय क्षेत्रात काम करायचे हि जिद्द मनी बाळगुन तिने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला.चिकाटीने अभ्यास करून तिने वैद्यकिय कोर्स पुर्ण केला.



शुक्रवारी बीड येथे ऑल इंडिया सेंट्रल काउन्सिल ऑफ होमिओपॅथीचे प्रेसिडंट व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण भस्मे यांचे हस्ते दिक्षांत समारोहात प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.या वेळी उपप्राचार्य गणेश पांगारकर,डॉ.अंजली पांगारकर,डॉ.सुरेश तोष्णीवाल सह डॉ.शिवानीचे आई,वडील व बंधू उपस्थित होते.पत्रकार विजयकुमार गाडेकर यांची डॉ शिवानी ही नात आहे. शिवानी गाडेकरचे डॉक्टर झाल्याबद्दल सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री,नगरपंचायत नगराध्यक्ष रोहिदास पाटील,माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील,गटनेते गणेश भांडेकर,सेवानिवृत्त पोलीस अधिकारी रावसाहेब पाटील,मा.सरपंच सुनिल पाटील, प्रा.भालचंद्र भांडेकर,अनिल गाडेकर,भाऊसाहेब गाडेकर आदीसह विविध क्षेत्रातून स्वागत होत आहे.

# ‘तुळजाभवानी अर्बन’ची गगनभरारी!

## मार्च २०२४ अखेर संस्थेकडे ६०१ कोटींच्या ठेवी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या तुळजाभवानी अर्बनने ३१ मार्च २०२४ अखेर ६०१ कोटी रूपये ठेवींचा टप्पा यशस्वी केला आहे. हे अभूतपूर्व यश तुळजाभवानी अर्बनचे ठेवीदार, सभासद, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतकांच्या विश्वासामुळे शक्य झाले आहे, अशी माहिती तुळजाभवानी अर्बनचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली आहे.**



बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीचा मानबिंदू ठरलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव या संस्थेने मोठी गगनभरारी घेतली आहे. ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत ६०१ कोटी ३९ लाख रूपयांच्या ठेवींचा टप्पा यशस्वी करून पुन्हा ग्राहकांमध्ये विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब केले आहे. संस्थेचा प्रगतीचा आलेख पाहता कर्ज वितरण ३८३ कोटी गुंतवणूक २७८ कोटी २५ लाख, एन.पी.ए.ग्रॉस ७ टक्के नेट २.९७ टक्के तर निव्वळ नफा १८ कोटी ६२ लाख यात स्वनिधी ५४ कोटी ३४ लाख आहे, अशीही माहिती तुळजाभवानी अर्बनच्या व्यवस्थापनाने दिलेली आहे. सहकार क्षेत्रात वेगळी ओळख आणि प्रगतीचा नवा उच्चांक गाठण्यास तुळजाभवानी अर्बन परिवार यशस्वी झाला आहे, याचे संपूर्ण श्रेय संस्थेचे ठेवीदार, ग्राहक, सभासद आणि हितचिंतकांच्या असलेल्या विश्वासामुळे हे शक्य झाले, असे चेअरमन चंद्रकांत शेजुळ म्हणाले.

### सभासदांच्या विश्वासाला सदैव पात्र राहू : चंद्रकांत शेजुळ

३१ मार्च २०२४ ताळेबंदाबद्दल चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सद्यपरिस्थितीत अनपेक्षितपणे तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटमध्ये ठेवलेल्या ठेवी पाहता आणि मिळालेला नफ्याचा विचार करता सभासदांनी दाखवलेला हा विश्वास आहे. आगामी काळातही ग्राहक आणि सभासदांच्या हितासाठी तत्पर राहू, संस्थेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या सभासदांच्या विश्वासाला सदैव पात्र राहू, अशी ग्वाही चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली.

### तुळजाभवानी अर्बनच्या टीमचे मोठे योगदान

सहकार क्षेत्रातील तुळजाभवानी अर्बनच्या यशात ग्राहक, सभासदाप्रमाणेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ, सर्व संचालक मंडळ, कोअर टीमचे सदस्य आणि सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान आहे. तुळजाभवानी अर्बनची सक्षम टीम आणि तत्पर अधिकाऱ्यांमुळे संस्था गगनभरारी घेत आहे.

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

बीड / प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा बीड शहरातील तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालयात रविवार (दि.७) एप्रिल रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत होणार आहे. या स्पर्धेत आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड यांच्याकडून करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये जयभीम उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सदरील महोत्सव १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा होतो आहे. त्या अनुषंगाने महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज, छ.शाहु महाराज, डा.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, राजमाता जिजाऊ, माता रमाई,अहिल्यादेवी होळकर, क्रांती ज्योती सावित्रीमाई यांच्यासह आदी महामानवांच्या जीवनावर प्रश्न विचारले जाणार आहेत. या स्पर्धेत प्रवेश घेण्यासाठी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे प्रमुख सुर्यकांत जोगदंड, प्रा. राम गायकवाड, प्रा. अशोक गायकवाड, इंजि. विजय भालेराव, सुनिल बळवंते, महादेव इनकर, गणेश सरवदे या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून करण्यात आल आहे.

# गजानन नागरी सहकारी बँकेला २ कोटी ७ लाखाचा नफा

बीड । प्रतिनिधी

सर्वांना आपलं मानणारी आपली बँक या दृढ विश्वासाने १६८ कोटी रूपये व्यवसाय असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेला मार्च २०२४ अखेर २ कोटी ८६ लाख ८७ हजाराचा ढोबळ नफा झाला असून करपुर्व नफा १ कोटी ६२ लाख ६७ हजाराचा नफा झालेला आहे अशी माहिती बँकेचे अध्यक्ष जयदत्त (आण्णा) क्षीरसागर, उपाध्यक्ष जगदीश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर.क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ.एम.एस. शेख यांनी दिली.

बँकेची मार्च २०२४ अखेर वित्तीय स्थिती मध्ये भाग भांडवल ४ कोटी ४६ लाख, राखीव व इतर निधी १७ कोटी १ लाख, ठेवी १०२ कोटी ६६ लाख, कर्जे ६४ कोटी ९८ लाख, सी.डी. रेशो ६३.३० टक्के, ग्रॉस एन.पी.ए.३.४४ टक्के, नेट एनपीए शुन्य टक्के, नफा २ कोटी ७ लाख, भांडवल पर्याप्त रेशो ३२.४९ टक्के, खेळते भांडवल १२७ कोटी ११ लाख आहे. तसेच बँकेचा ॲव्हरेज बोरोविंग रेट ५.८५ टक्के व ॲव्हरेज लेंडींग रेट १०.३१ टक्के असून वाढावा ४.४६ टक्के आहे. रिझर्व्ह बँकेचे सर्व नॉर्मस्? पूर्ण करीत आहे. बँकेचे मुख्य कार्यालय व १) मुख्य शाखा, सागर हाईट्स बस स्टँडसमोर बीड येथे असून २) नवगण शाखा, ३) जुना मोंढा बीड शाखा, ४) पेठ बीड शाखा, ५) नेकनुर येथे शाखा, ६) रायमोह शाखा, ७) चौसाळा शाखा, ८) शिरूर (कासार) शाखा, ९) पिंपळनेर शाखा, व १०) छत्रपती संभाजीनगर शाखा कॅनॉट प्लेस सिडको येथे आहे. या दहा शाखांना ग्राहकांचा प्रतिसाद ,चांगला असून बँकेचे एकूण ग्राहक संख्या ३०३५२ येवढी आहे. बँक आपल्या ग्राहकांना विविध प्रकारच्या सेवा देत आहे. सदर सेवे पासुन बँकेचे समाधान व्यक्त करीत आहे. गत वर्षी श्री गजानन नागरी सहकारी बँकेला दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनकडून १०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या युनिट बँका गटातून दिला जाणारा महाराष्ट्र राज्यातून सर्वोत्कृष्ट बँक २०२३ प्रथम पुरस्कार बँकेला मिळाला आहे. बँक नवगण शाखा येथे एटीएम सेवा लवकरच ग्राहकांच्या सेवेत सुरू करत आहे. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. या यशात बँकेचे अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर, उपाध्यक्ष जगदीश काळे व सर्व संचालक मंडळाचे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर.क्षीरसागर व बँकेचे सरव्यवस्थापक डॉ.एम.एस. शेख, व्यवस्थापक व्ही.एल. कुंबेफळकर व सहा.व्यवस्थापक श्री के.ए. लांडे यांचेसह इतर सर्व कर्मचार्यांचे मोलाचे योगदान आहे.

# ‘पिंजरा’ कथेतून मांडली दुष्काळात वन्यजिवांची तडफड

## डॉ. विठ्ठल जाधव यांच्या कथाकथनाने आणली रंगत

बीड । प्रतिनिधी

शालेय शिक्षण विभाग आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बीड यांचे वतीने आयोजित ग्रंथोत्सवात निमंत्रितांचे कथाकथन अंबाजोगाई येथील नागापूरकर सभागृहात दि.२९ रोजी संपन्न झाले. साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांनी ‘पिंजरा’ ही सामाजिक, पर्यावरण विषयाला स्पर्श करणारी कथा सादर केली. कथाकथन सत्राचे अध्यक्षस्थानी मसापचे गोरख शेंद्रे हे होते तर परशूराम नागरगोजे, रमेश मोटे, अर्चना गोस्वामी हे कथाकार उपस्थित होते.




जिल्हा ग्रंथालय अधिकारी बीडच्या वतीने दोन दिवसीय ग्रंथोत्सवात निमंत्रितांचे कथाकथन अंबाजोगाई येथील नागापूरकर सभागृहात संपन्न झाले. डॉ. विठ्ठल जाधव यांनी ‘पिंजरा’ ही कथा खुमासदार शैलीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गावात वाघ आल्यावर गावकऱ्यांची त्रेधातिरपीट उडते. त्या वाघिणीस पकडले जाते. त्यातून वाघ आणि बछडे यांचीही ताटातूट होते. दुष्काळाचे परिणाम वन्यजीवांवर होतात याचे मर्म सांगणारी ‘पिंजरा’ ही कथा रसिकांना मंत्रमुग्ध करणारी होती. परशूराम नागरगोजे (सौताडा) यांनी प्रथमच ऊसतोडीचे संदर्भ विषद करणारी आयुष्याची संध्याकाळ ही कथाकथन केली. तर सासू-सून या कौटुंबिक जिव्हाळा सांगणारी ‘शेवटची भेट’ ही कथा अर्चना गोस्वामी यांनी सादर केली.

रमेश मोटे (लाडझरी) यांनी ‘दादू’ ही कथा सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. दादूच्या नाना करामती सामाजिक भान राखत होत्या. पात्र आणि प्रसंग यांचा सम्यक मेळ घालत कथा प्रवेश आणि कथेचा प्रवास रम्य झाला. अध्यक्षीय कथाकार गोरख शेंद्रे यांनी ‘संप्या’ ही व्यक्तीरेखा पुरामध्ये कर्तृत्व गाजवते ही कथा वर्तमान काळातील प्रसंगातून साकारली. खास शैलीत कथेने लक्ष वेधले. त्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले तर कथा निवड, पात्र, प्रसंग, संवाद आणि अभिनय, आरोह अवरोह याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. बीडचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय म्हस्के, पुरूषोत्तम राऊत, ढाकणे, गझलकार प्रा. मुकुंद राजपंखे, नागनाथ बडे, विश्वंभर वराट, भारकर बडे, पत्रकार श्रावणकुमार जाधव, ग्रंथालय चळवळीचे चंद्रसेन चोबे, विश्वंभर गणाचारी, संतोष गायकवाड, राजेंद्र रापतवार यांचेसह ग्रंथप्रेमी, विद्यार्थी, रसिक उपस्थित होते. डॉ. शशिकांत पुरी यांनी कथाकथन सत्राचे सुत्रसंचलन केले.

# संजय उडाण यांच्या इफ्तार पार्टीतून हिंदू, मुस्लिम बांधवातील ऐक्याचे अनोखे दर्शन

## बार्शी नाका येथे २५ वर्षापासून केले जाते इफ्तार पार्टीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका येथे नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने मंगळवारी मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बार्शी नाका तसेच परिसरातील मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवक संजय उडान, माजी आमदार प्रा. सुनील दादा धांडे, माजी आमदार सय्यद सलीम, पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज, माजी जि. प.सदस्य किशोर भैय्या जगताप, नितीन भैय्या धांडे, सभापती खुर्शीद आलम, मसीभाई, मशरूभाई पठाण उपस्थित होते.



बार्शी नाका येथील रोजा इफ्तार पार्टीला गेल्या २५ वर्षाची परंपरा असून संजय उडान यांच्या वतीने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून बार्शी नाका भागात हिंदू, मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन घडते. तसेच या निमित्ताने एक सामाजिक सलोख्याचा संदेश देण्याचे काम नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने केले जात असून याबद्दल बार्शी नाका व बीड शहरातून नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाचे भरभरून कौतुक केले जात आहे.

बार्शी नाका येथील लोकप्रिय नगरसेवक तसेच सामाजिक कार्यातून आपली आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे नगर सेवक संजय भाऊ उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बार्शी नाका येथे मुस्लीम बांधवांसाठी मंगळवारी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. बीडमध्ये गेल्या २५ वर्षापासून बार्शी नाका येथील हिंदू, मुस्लीम ऐक्याचे अनोखे दर्शन घडवणारी ही इफ्तार पार्टी आहे. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र असा रमजान महिना सुरू आहे.

बीड शहरातील बार्शी नाका येथे गेल्या २५ वर्षापासून नगरसेवक संजय भाऊ उडाण व बीएन मित्र मंडळ यांच्या वतीने मुस्लीम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते, या निमित्ताने बार्शी नाका येथील हिंदू, मुस्लिम बांधवातील ऐक्याचा अनोखा संदेश देण्याचे काम नगरसेवक संजय उडाण व बीएन मित्र मंडळ यांच्या वतीने केले जात आहे. या बद्दल नगर सेवक संजय उडाण व बिएन मित्र मंडळाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# सोहम अमझरेची नवव्या वर्षी नऊ हजार ओव्यांची ज्ञानेश्वरी पाठ



शिरूर । प्रतिनिधी

वयाच्या नवव्या वर्षी नऊ हजार ओव्याचा ज्ञानेश्वरी ग्रंथ सोहम अमझरेने मुखपाठ केला आहे.या अलौकिक कामगिरीची दखल श्री क्षेत्र देहू येथे बुधवारी तुकाराम बीजेच्या पर्वणीवर घेण्यात आली आहे.वारकरी प्रस्थानत्रयी मुखोद्गत गौरव योजना गाथा मंदिर समितीने आधी सहा दिवस सोहमकडून ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचून घेतला.

या सहा दिवसात त्याने ग्रंथ न पहाता ‘‘ओम नमो जी आद्यापासुन ते थेट आता विश्वात्मके देवे ‘‘ पर्यंत ग्रंथ वाचन केला.सहा दिवसाच्या या परिक्षेनंतर सोहम अमझरेचा राष्ट्रसंत गोविंदगिरी महाराज व गाथा मंदिराचे प्रमुख पांडूरंग बुवा घुले यांच्या हस्ते गाथा मंदिर विश्वस्तांकडून ५१००० रुपयांचा धनादेश व प्रशस्ती पत्र देऊन गौरव केला.देहू येथे झालेल्या सोहमच्या कौतुक सोहळ्यास त्याचे वडील वारकरी सांप्रदायाचे पाईक पुंजाराम अमझरे व सोहमची आई सिमा अमझरे आवर्जुन उपस्थित होते.सोहमवर हे धर्मसंस्कार करणा-या माता-पित्यांना धन्यता देत त्यांचाही सन्मान केला.साहजिकच त्यांचे आनंदाश्रू इंद्रायणीच्या पाण्यात एकरूप झाले होते.या कार्यक्रमास गाथा मंदिराचे प्रमुख विश्वस्त पांडूरंगबुवा घुले सह प्रख्यात किर्तनकार,वारकरी मंडळी मोठ्या संखेने उपस्थित होते.ज्ञानेश्वरीचा कधीही विसर पडू नये.माझेकडून अव्याहतपणे सेवा घडावी हीच माऊलीच्या चरणी प्रार्थना असल्याची भावना सोहमने यावेळी व्यक्त केली.



# सुजय विखेंना पैशाची मस्ती, गरीबांची ते अशीच टिंगल करतात; 'इंग्रजी'च्या आव्हानावर निलेश लंकेंचा टोला

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या एकमेकांच्या कामावरून आरोप प्रत्यारोपाच्या फैरी आता एकमेकांच्या शिक्षणाकडे वळाल्याचं दिसून येतंय. महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी माझ्या एवढे इंग्रजीत बोलून दाखवावे, भलेही महिनाभर वेळ घेऊन पाठ करून बोलून दाखवावे, मी उमेदवारी अर्ज भरणार नाही असं आव्हान अहमदनगर दक्षिण लोकसभेचे भाजपचे उमेदवार सुजय विखेंनी दिलं होतं. या टीकेला निलेश लंके यांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिलं. सुजय विखे हे श्रीमंत कुटुंबातील आहेत, ते माझ्यासारख्या गरीब उमेदवाराची अशाच पद्धतीने टिंगल करतील, ही त्यांच्याकडे असलेल्या पैशाची मस्ती आहे असं प्रत्युत्तर निलेश लंके यांनी दिलं.

सुजय विखेंना पैशाची मस्ती

इंग्रजी बोलणण्यावरून सुजय विखेंनी





केलेल्या टीकेला निलेश लंकेंनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. ते म्हणाले की, समोरचे उमेदवाराकडे असलेल्या पैशाची मस्ती आहे. एका बाजूला सांगायचं की जे सक्षम आहे त्यांनीच राजकारण करायचं, दुसरीकडे सांगायचं निलेश लंकेला इंग्रजी बोलता येत नाही. पण मी एका शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्माला आलो आहे. त्यामुळे मी इंग्लिश मीडियम शाळेत शिक्षण घेऊ शकलो नाही.

निलेश लंके यांनी सुजय विखेंना प्रत्युत्तर देत अहमदनगर दक्षिण लोकसभेची निवडणूक ही गरीब विरुद्ध श्रीमंत अशी असल्याचं म्हटलं. सोबतच तुम्ही वैयक्तिक टीकाटिप्पणी करण्यापेक्षा पाच वर्षात काय काम केलं यावर बोला असं आव्हान निलेश लंकेंनी दिलं आहे.

काय म्हणाले होते सुजय विखे?

नगरचे भाजप उमेदवार सुजय विखेंनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार निलेश लंके यांच्यावर टीका करताना त्यांचे शिक्षण काढलं होतं. निलेश लंकेंनी पाठांतर करून का होईना, माझ्याएवढं इंग्रजी बोलावं, मी नगरमधून उमेदवारी अर्ज मागे घेईन असं आव्हान सुजय विखेंनी दिलं होतं. सुजय विखेंच्या या आव्हानावर विरोधी पक्षांनी जोरदार टीका केली. रोहित पवार टीका करताना म्हणाले की, लोकप्रतिनिधीला इंग्रजी-हिंदी समजते की नाही हे महत्वाचं नसतं तर लोकप्रतिनिधीला जनतेची भाषा, त्यांच्या अडचणींची भाषा समजली पाहिजे आणि जनतेची भाषा समजण्यात आम्ही दिलेले उमेदवार माहीर आहेत. नाहीतर इंग्रजी-हिंदी येऊनही संसदेत गप्प बसणाऱ्या भाजप खासदारांची, प्रश्नांची उत्तरं न देता येणाऱ्या मंत्र्यांची संख्या काही कमी नाही.

# 'उखाड के फ़ेक देंगे' आ.बच्चू कडू यांचा हल्लाबोल

### बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती लोकसभा मतदारसंघातून आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांनी उमेदवारी अर्ज आज दाखल केला. यावेळी प्रहार पक्षाकडून भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी बच्चू कडू यांनी आपल्या भाषणात आमदार रवी राणा आणि खासदार नवनीत राणा यांच्यावर घणाघात केला. 'हम डरते नहीं. डराने वालों को हम डराते है. तानाशाही नहीं चलेगी. उखाड के फेक देंगे' असा हल्लाबोल बच्चू कडू यांनी केला.

कडू म्हणाले, जेव्हा निकाल हाती येईल तेव्हा देशातील नेते पहात राहतील. तुम्ही हळदी-कुंकू घेता. इकडे फिनल मिलचा कामगार आत्महत्या करत आहे. आमचा प्रहार पक्ष स्वतंत्र आहे. आम्ही सर्वसामान्य माणसाचे गुलाम आहोत. काल एक चिठ्ठी आली- जास्त बोलाल तर जेलमध्ये जाल. बच्चू कडू कार्यकर्त्यांची अवलाद आहे. दुपट्टा घातला आणि नेता झाला अशी परिस्थिती नाही. जेलमध्ये टाकले तरी जेलमधून आवाज काढणार. रामदेव बाबाने उद्योग सुरू केले. बचत गटाचे





काय? मोदी म्हणायचे अच्छे दिन आएंगे. हे आहेत का अच्छे दिन? १७ रुपयांच्या फाटक्या साड्या वाटल्या. हेच का अच्छे दिन?'', असा प्रश्न बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

निवडणुकीमध्ये मेळघाटमध्ये साड्या वाटता. तिथे पाण्याची गरज आहे. रोजगाराची गरज आहे. गोडाऊनमध्ये पडलेल्या साड्या वाटल्या आहेत. या जिल्ह्याची जर कोणी प्रतिमा खराब करत असेल तर आईची शपथ आम्ही सोडणार नाही. जातप्रमाणपत्रात सांगितले आहे की, हा गुन्हा आहे. पण अजून निकाल नाही. म्हणून राणा आता जनतेच्या न्यायालयात आहे असे बच्चू कडू म्हणाले.

# विजेंदर सिंहची काँग्रेसला सोडचिठ्ठी, भाजपमध्ये प्रवेश

नवी दिल्ली । वृत्तसेवा

मुष्टीयोद्धा (बॉक्सर) विजेंदर सिंहने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला. विजेंदर सिंह यापुर्वी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी दक्षिण दिल्लीतून २०१९ ची लोकसभा निवडणूकही लढवली होती. मात्र, भाजपचे रमेश बिधुरी यांच्याकडून त्यांचा पराभव झाला होता. दरम्यान, साक्षी मलिक आणि इतर काही महिला खेळाडूंसोबत झालेल्या गैरप्रकाराबाबत विजेंदर सिंह यांनी भाजप विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती.

मुष्टीयोद्धा (बॉक्सर) विजेंदर सिंहने बुधवारी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, भाजप नेते रामवीर सिंह बिधुरी आणि राजीव बब्बर यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर "मी देशहितासाठी आणि लोकांच्या




सेवेसाठी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. मला अधिकाधिक लोकांना मदत करायची आहे.'' असे विजेंदर सिंह म्हणाले. सुत्रांच्या माहितीनुसार, विजेंदर सिंह यांना काँग्रेसच्या वतीने आगामी निवडणुकीत मथुरा लोकसभेतून खासदार आणि अभिनेत्री हेमा मालिनी यांच्याविरोधात लढवण्याचा विचार केला जात होता. मात्र, त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी विजेंदर सिंह काँग्रेसमध्ये सामील झाले होते. यावेळी त्यांनी "माझ्या बॉक्सिंग करिअरमधील वीस वर्षांहून जास्त काळ देशाला अभिमान वाटेल, असे काम केले आहे. आता माझ्या देशासाठी काहीतरी करण्याची आणि त्यांची सेवा करण्याची इच्छा आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या वतीने मी ही संधी घेऊ इच्छितो आणि यासाठी राहुल गांधी, प्रियंका गांधी यांचे आभार मानतो,'' अशी प्रतिक्रिया दिली होती. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेतही ते सहभागी झाले होते.

# 'न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावू नका'

### अजित पवार गट घड्याळ न्यायप्रविष्ट नमूद करत नसल्याने सुप्रीम कोर्टाने झापलं

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील शरद पवार गट आणि अजित पवार गटामध्ये पक्षाचे नाव आणि चिन्हासाठी सुरु असलेल्या कायदेशीर लढाईत सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी अजित पवार गटाला चांगलेच खडसावले आहे. कोर्टाच्या आदेशाचं अजित पवार गट पालन करत नसल्याचा आरोप करत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांच्याकडून याचिका दाखल करण्यात आली होती. अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मिळालेलं घड्याळ हे चिन्ह न्यायप्रविष्ट आहे असं जाहिरातीत लिहिणं आवश्यक आहे मात्र त्याचं पालन होत नसल्याची तक्रार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने केली होती. त्यानंतर सुप्रिम कोर्टानं अजित पवार गटाला आदेशाचे पालन करण्यास सांगितले आहे. अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नाही, असा युक्तिवाद अभिषेक मनु सिंघवी यांनी केला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ कोणी लावू शकत नाही, असे देखील सुप्रीम कोर्ट म्हणाले.

आतापर्यंत प्रसिद्ध केलेल्या जाहिराती न्यायालयात सादर करा, सुप्रीम कोर्टाचे अजित पवार गटाला आदेश

अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केलेले नाही, असा अर्ज शरद पवार गटाचा आहे. तर सर्वोच्च न्यायालयाच्या




आदेशातील शेवटची ओळ बदलण्यात यावी असा अर्ज अजित पवार गटाने दाखल केला आहे. अजित पवार गटाच्या वतीने मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला. निवडणूक आयोगाच्या आदेशावर स्थगिती नाही, त्यामुळे आम्ही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे हे लिहीत आहोतच. फक्त आदेशतील शेवटची ओळ बदलण्यात यावी, असा युक्तिवाद मुकुल रोहतगी यांनी केला. त्यानंतक सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला आतापर्यंत प्रसिद्ध केलेल्या जाहिराती न्यायालयात सादर करायला सांगितल्या आहेत . याविषयी लवकरच पुढील सुनावणी घेण्यासाठी प्रकरण बोर्डावर घेऊ असं न्यायालयाने म्हटले आहे.

# गोंदिया : आठ गावांचा मतदानावर बहिष्कार?



गोंदिया । वृत्तसेवा

महाराष्ट्रासह देशभरात लोकसभा निवडणुकीचा बिगूल वाजला आहे. या लोकसभा निवडणुकीचे पहिल्या टप्प्यातील मतदान येत्या १९ एप्रिलला होणार आहे. असे असताना महाराष्ट्रातील ८ गावांच्या गावकऱ्यांनी थेट मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव नगर परिषदेचा गेल्या १० वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहे. याबाबत राज्य शासनातर्फे सुप्रीम कोर्टामध्ये याचिका दाखल करण्यात आली आहे. पण या याचिकेवर गेल्या अनेक वर्षांपासून निर्णय लागत नसल्याने आमगाव येथील नागरिकांनी आमगाव नगर संघर्ष समिती स्थापन करून लोकसभेच्या निवडणुकीमध्ये बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. या बहिष्काराच्या निर्णयावर आज आमगाव येथील तहसील कार्यालयामध्ये सभा घेण्यात आली.

एका बाजूला आमगाव नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या ८ गावांतील नागरिक हे बहिष्कार करण्याच्या बेतात आहेत. मात्र स्थानिक पातळीवर अनेक पक्षांचे समर्थक याला विरोध दर्शवित असल्याचे दिसून आले आहे. कारण हा प्रश्न राज्य शासनाशी संबंधित आहे. जेव्हा विधानसभेच्या निवडणुका होतील त्यावेळेस आपण सर्व मिळून बहिष्कार टाकू, अशी भूमिका काहींनी मांडली आहे.

# आम्ही संस्कारी, चारित्र्यहनन मुद्द्यावर प्रणिती शिंदेंना राम सातपुतेंनी फटकारलं

**सोलापूर । प्रतिनिधी**

विरोधक खोटे आरोप करुन माझं चारित्र्यहनन करतील, असा आरोप सोलापूरच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदेंनी विरोधकांवर केला होता त्यांच्या या आरोपाला राम सातपुतेंनी काय प्रत्युत्तर दिलं आहे. आम्ही संस्कारी असून आमच्यावर असले संस्कार नाहीत, असं सांगत त्या आमच्या भगिनी आहेत, त्यांनी फालतू गोष्टींवर बोलण्यापेक्षा विकासावर बोलावं, मी फक्त विकासावरच बोलत असल्याचं प्रत्युत्तर भाजप उमेदवार राम सातपुतेंनी दिलं आहे.

येत्या काही दिवसांत माझं चारित्र्यहनन करणारे फोटो, पोस्ट दाखवल्या जातील, माझी बदनामी केली जाईल, असा संशय काँग्रेस उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी जाहीर कार्यक्रमात बोलून दाखवला यानंतर चर्चेला उधाण आलं होतं. यावर कडक शब्दांत प्रतिक्रिया देताना आम्ही संस्कारी असून आमच्यावर असले संस्कार नाहीत, असं सांगत त्या आमच्या भगिनी आहेत, त्यांनी फालतू गोष्टींवर बोलण्यापेक्षा विकासावर बोलावं, मी फक्त विकासावरच बोलत असल्याचं




उत्तर भाजप उमेदवार राम सातपुते यांनी दिलं आहे.

दरम्यान, मंगळवार सकाळपासून पंढरपूर तालुका आणि शहरात राम सातपुते यांनी गाठीभेटीचा कार्यक्रम सुरू केला होता. रात्री उशिरा पंढरपुरात फडावर करताना त्यांनी शाहिद मेजर कुणाल गोसावी यांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रतिमेस वंदन केलं. यावेळी झालेल्या बैठकीत प्रणव परिचारक, नीलराज डोंबे, लेखन चौघुले यांचेसह परिचारक गटाचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होतं.

फडणवीसांनी सोलापूरला जितकं दिलं तेवढं काँग्रेसनं दिलं का? राम सातपुतेंचा थेट सवाल

सोलापूर लोकसभेला आमदार राम सातपुते यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते यांनी एकमेकांवर केलेल्या आरोप प्रत्यारोपानं निवडणूक गाजायला लागली होती. निवडणुकीची लाईन विकासावरून घसरून तिसरीकडेच चालल्याचं पाहून भाजप उमेदवार राम सातपुते यांनी आता आपण फक्त विकासावरच बोलणार असल्याचं सांगून प्रणिती यांनीही फक्त विकासावरच बोलावं, असं सुनावलं आहे. फडणवीसांनी सोलापूरला जितकं दिलं तेवढं काँग्रेसनं दिलं का? असा सवाल करत त्यांनी सोलापुरातील केलेल्या कामांचा पाढा वाचला. प्रणिती शिंदे यांच्याकडे बोलण्यासारखं काहीच नसल्यानं वाटेल तशी वक्तव्य करत असून पुलवामा हल्ल्यावरील आरोप हा तर तमाम शहिदांचा अवमान असल्याचं सातपुते यांनी सांगितलं आहे.

# काँग्रेसने जात प्रमाणपत्र सदोष असूनही रश्मी बर्वेंना उमेदवारी का दिली? मनीषा कायंदे यांचा सवाल

**नागपूर । प्रतिनिधी**

रामटेक येथील काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांची उमेदवारी सदोष जात प्रमाणपत्र असल्याने बाद ठरू शकते हे काँग्रेस पक्षाला माहित असताना देखील त्यांना काँग्रेसने उमेदवारी का दिली, असा सवाल शिंदे गट-शिवसेना सचिव मनीषा कायंदे यांनी उपस्थित केला आहे. मविआने याबाबत विरोधकांना लक्ष्य केले असताना शिवसेनेने आता विरोधकांवर पलटवार केला. उमेदवारी देउन फॉर्म भरायला लावला त्यानंतर त्यांचे जात प्रमाणपत्र सदोष असल्याचे लक्षात आले. हे होणारच हे काँग्रेस पक्षाला माहित





होत, असा दावा मनीषा कायंदे यांनी केला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी नेहमी महिलांसाठी हे करु ते करु म्हणतात, महिलांसाठी मोठ्या मोठ्या गोष्टी करु असे म्हणतात. मात्र स्वतःच्याच पक्षाच्या महिला उमेदवारासोबत असे कृत्य करुन एखादी महिला राजकारणात आल्यावर तिचे खच्चीकरण करायचे ही केवळ काँगेस पक्षाची निती असू शकते, अशी टीका कायंदे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

# मी दावेदारी सोडली नाही, मीच अर्ज भरणार, तिकीट कापल्यानंतर भावना गवळी यांचा आक्रमक पवित्रा!

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असणाऱ्या यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाबाबत शिंदे गटाकडून बुधवारी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. गेल्या पाच टर्मपासून यवतमाळच्या खासदार असलेल्या भावना गवळी यांचे तिकीट कापण्यात आले आहे. त्यांच्याऐवजी हिंगोलीचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील ( ) यांना यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. राजश्री पाटील या गुरुवारी यवतमाळ लोकसभा मतदारसंघाच्या





महायुतीच्या अधिकृत उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे आता भावना गवळी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

भावना गवळी या गेल्या काही तासांपासून लोकसभेच्या उमेदवारीसाठी मुंबईत ठाण मांडून आहेत. सर्वेक्षणाचा निकाल काहीही असो पण मी गेल्या अनेक वर्षांपासून यवतमाळ वाशिममधून निवडून येत आहे. या मतदारसंघात माझी मोठी ताकद आहे. त्यामुळे मी पुन्हा यवतमाळ लोकसभा मतदारसंघातून निवडून येऊ शकते, असे भावना गवळी यांचे म्हणणे होते. परंतु, तरीही एकनाथ शिंदे यांनी भावना गवळी यांचा पत्ता कट करुन राजश्री पाटील यांना यवतमाळची उमेदवारी दिली आहे. मात्र, या निर्णयानंतरही भावना गवळी यांनी आपली तलवार म्यान केलेली नाही. भावना गवळी यांनी बोलताना सांगितले की, मी यवतमाळ-वाशिम मतदारसंघावरील दावेदारी अद्याप सोडलेली नाही. मी आता माझ्या मतदारसंघामध्ये परत जात आहे. मी यवतमाळ-वाशिममधून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे, असे भावना गवळी यांनी सांगितले. त्यामुळे आता भावना गवळी या महायुतीच्या अधिकृत उमेदवार राजश्री पाटील यांच्याविरोधात बंडखोरी करुन अर्ज भरणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. भावना गवळी यांनी खरोखरच अपक्ष उमेदवारी अर्ज भरल्यास राजश्री पाटील यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

### भावना गवळींचे सर्व प्रयत्न फोल ठरले

यवतमाळ-वाशिममधून आपले तिकीट कापले जाणार याची कुणकुण भावना गवळी यांना आधीच लागली होती. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून भावना गवळी पुन्हा उमेदवारी मिळवण्यासाठी राजकीय भेटीगाठी घेत होत्या. काही दिवसांपूर्वी त्यांनी मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. यानंतर त्यांनी नागपूरमध्ये थेट देवेंद्र फडणवीस यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला होता. हा प्रयत्न फोल ठरल्यानंतर भावना गवळी बुधवारी सकाळपासून मुंबईत ठाण मांडून होत्या. यवतमाळ-वाशिममध्ये उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आज मुंबईत निर्णय होणार, याची जाणीव गवळी यांना होती. त्यामुळे भावना गवळी शेवटपर्यंत एकनाथ शिंदे यांच्याशी बोलून आपले तिकीट वाचवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, बुधवारी संध्याकाळी शिंदे गटाकडून राजश्री पाटील यांना यवतमाळ-वाशिममधून उमेदवारी अर्ज भरण्याचा आदेश देण्यात आला आणि भावना गवळी यांचे सर्व प्रयत्न फोल ठरले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बांधकामांसाठी पिण्याचे पाणी वापरले जात असेल तर बांधकामांवर कारवाई करणार-महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले

## उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ३४ गावांतील टँकर्सची संख्या वाढवा; महापालिका आयुक्तांचे अधिकार्‍यांना आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

कडक उन्हाळा आणि धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने पाण्याचा सुयोग्य वापर करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. प्रामुख्याने शहरात सध्या सुरू असलेल्या बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर केला जात असल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांसाठी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रात प्रक्रीया केलेले पाणीच वापरावे असे आवाहन करतानाच समाविष्ट गावांतील पाण्याच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी योग्य पद्धतीने नियोजन करा अशा सुचना महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी अधिकार्यांना दिल्या आहेत.

महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी पाणी पुरवठा विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीविषयी त्यांनी पत्रकारांना माहीती दिली. महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट केल्या गेलेल्या ३४ गावांतील पाणी पुरवठा व्यवस्थेची माहीती घेण्यात आली आहे. या गावांतुन मोठ्या प्रमाणावर पाण्याच्या तक्रारी येत आहे. या तक्रारींचा निपटारा करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. या समाविष्ट गावांत काही ठिकाणी चार , तीन, दोन दिवसांच्या अंतराने पाणी पुरवठा केला जात आहे. आवश्यक तेथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याच्या सुचना दिल्या आहेत. गेल्यावर्षी या गावांत १ हजार ९८ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता, यावर्षी हाच आकडा साडे बाराशेपर्यंत पोचला आहे, अशी माहीती भोसले यांनी दिली. समाविष्ट गावांतील पाणी पुरवठ्यासंदर्भात आराखडा तयार केला जात आहे, तो लवकर पुर्ण करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या आहेत.




तर बांधकामे थांबविणार

पुणे शहराला पाणी पुरवठा करणार्या खडकवासला धरण साखळीतील पाणी साठा कमी होत आहे. उन्हाळ्याचे दोन महीने अद्याप बाकी आहे, या कालावधीत पाण्याची मागणी वाढते, तसेच बाष्पीभवनाचे प्रमाण अधिक असते. यापार्श्वभुमीवर पुढील काळातील पाणी पुरवठ्याच्या नियोजनासंदर्भातही या बैठकीत चर्चा झाली. शहरातील बांधकाम व्यावसायिकांकडून पिण्याच्या पाण्याचा वापर हा बांधकामासाठी केला जात आहे.

बांधकामांकरीता एसटीपीमध्ये प्रक्रीया केलेल्या पाण्याचा वापर करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.परंतु याला बांधकाम व्यावसायिकांकडून कमी प्रतिसाद मिळत आहे. केवळ ८० टँकर प्रक्रीया केलेले पाणी नेले जात आहे. पुढील काळात याबाबत प्रशासन गांभीर्याने कार्यवाही करणार आहे. वेळ पडली तर शहरातील बांधकामे थांबवावी लागतील. बांधकाम व्यावसायिकांनी एसटीपीमध्ये प्रक्रीया केलेल्या पाण्याचा वापर करावा असे आवाहन केले आहे. या बांधकाम व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. तसेच क्षेत्रीय कार्यालयाने त्यांच्या भागातील सुरु असलेली बांधकामे आणि त्या ठिकाणी कोणत्या पाण्याचा वापर केला जात आहे, याची पाहणी करून अहवाल सादर करावा असे आदेशही दिले आहे.

# व्हिडीओवाला पोलिस निलंबित; चिरीमिरी घेताना कॅमेर्‍यात झाला होता कैद

**पुणे । प्रतिनिधी**

लष्कर परिसरात फॅन्सी नंबरप्लेट असलेल्या दुचाकीचालकाकडून चिरीमिरी घेताना कॅमेर्यात कैद झालेल्या वाहतूक पोलिसाला तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. या पोलिस कर्मचार्याची पैसे घेतानाची क्लिप मागील दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली होती. पोलिस हवालदार विजय मेवालाल कनोजिया असे निलंबित केलेल्या कर्मचार्याचे नाव आहे. त्यांची नेमणूक लष्कर वाहतूक विभागात होती.

कनोजिया हे ३० मार्च रोजी महावीर चौकात कर्तव्यावर होते. तेथे दुपारी दीडच्या सुमारास एक दुचाकी कोहिनूर हॉटेलच्या बाजूने महावीर चौकाकडे आली. दुचाकीवर एक पुरुष व एक महिला होते. त्यांच्या दुचाकीचा नंबर फॅन्सी असल्याने त्यांना कनोजिया यांनी दंडात्मक कारवाईची भीती दाखवली. यानंतर त्यांच्या दुचाकीवर दंडात्मक कारवाई न करता चिरीमिरी घेऊन सोडून दिले. त्याचा व्हिडीओ कुणीतरी बनवून 'मार्च एन्ड एम. जी. रोड' असा मेसेज तयार करून सोशल मीडियावर व्हायरल केला.


कनोजिया यांच्यावरील कारवाईच्या आदेशात म्हटले आहे की, वाहनावर कायदेशीर कारवाई न करता सोडून दिले. या संशयास्पद वर्तनाच्या वायरल सोशल मीडियाच्या क्लिपमुळे पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाली आहे. त्या अर्थी तुम्ही तुमचे कर्तव्य करीत असताना बेशिस्त, बेजबाबदारपणाचे व पोलिस खात्याला अशोभनीय असे गैरवर्तन करून अत्यंत गंभीर स्वरूपाची कसुरी केली आहे. तुम्हाला विभागीय चौकशीतील कार्यवाहीच्या अधीन राहून शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत आहे. तुम्ही निलंबन कालावधीमध्ये दररोज राखीव पोलिस निरीक्षक, पोलिस मुख्यालय, पुणे शहर येथे हजेरी द्यावी, हा आदेश वाहतूक शाखेतील अति. कार्य. मुख्यालयातील पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांनी काढला आहे.

# मी किमान ५५ हजारांच्या मताधिक्याने निवडून येणार, वंचितचे उमेदवार वसंत मोरे यांचा विश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

वसंत मोरे यांनी मनसेला सोडचिठ्ठी देऊन जवळपास २० दिवसांचा कालावधी होऊन गेला. या संपूर्ण कालावधीत वसंत मोरे यांनी पुणे लोकसभेची उमेदवारी मिळावी यासाठी महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या.पण वसंत मोरे यांना उमेदवारी नाकारत आमदार रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर दुसर्या बाजूला महायुती कडून भाजपचे नेते मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे वसंत मोरे हे अपक्ष निवडणुक लढणार अशी चर्चा सुरू होती. त्याच दरम्यान वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली. त्या सर्व घडामोडी दरम्यान काल रात्री प्रकाश आंबेडकर यांनी वसंत मोरे यांना पुणे लोकसभेची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे आता पुणे लोकसभेच्या निवडणुकीत तिरंगी लढत पाहण्यास मिळणार आहे.

त्या उमेदवारी बाबत वसंत मोरे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की,मागील २५ वर्षापासुन राज ठाकरे यांच्यासोबत काम करत राहिलो. त्या कालावधीत पुणे महापालिकेमध्ये तीन वेळा नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचे सोने केले. या १५ वर्षाच्या नगरसेवक पदाच्या काळात सत्तेमध्ये नसताना देखील कात्रज प्रभागाचा सर्वांगीण विकास केला आहे. कात्रज प्रभाग हा शहरासमोर रोल मॉडेल ठरल आहे. माझ्याकडून प्रभागात सर्व विकास काम सुरू होती. त्याच दरम्यान राज ठाकरे यांनी पुणे शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. ती जबाबदारी देखील चोखपणे बजावत, शहरात पक्ष वाढविण्याचे काम केले.त्या माध्यमातुन लोकसभेची तयारी सुरू केली. पण पक्षातील काहींनी राज ठाकरे यांना माझ्याबद्दल निगेटिव्ह रिपोर्ट पाठवले.



त्यानंतर अनेक घडामोडी घडत गेल्या आणि त्यानंतर मी अखेर पक्षामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मी राज मार्गावर होतो आणि आता राजमार्ग सोडून राजगृहच्या मार्गावर गेलो आहे. पण राज ठाकरे यांच्यापासून दूर गेल्यानंतर मागील १५ दिवस माझ्यासाठी हा कठीण काळ होता अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. तसेच ते पुढे म्हणाले की, मला उमेदवारी मिळावी याकरिता महाविकास आघाडीच्या नेत्यांना भेटलो. पण मला काही कारणास्तव उमेदवारी मिळाली नाही. मात्र आज वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर यांनी उमेदवारी देऊन मला काम करण्याची संधी दिली. याबद्दल मी त्यांचा आभारी असून प्रकाश आंबेडकर यांना समाजातील प्रत्येक घटक मानणारा आहे. त्यामुळे या निवडणुकीत मला अधिकाधिक फायदा होईल आणि मी किमान ५५ हजारांच्या मताधिक्याने निवडून येईल असा विश्वास देखील यावेळी त्यांनी व्यक्त केला. तसेच ते पुढे म्हणाले की, मुरलीधर मोहोळ आणि रविंद्र धंगेकर या दोघांसोबत मी पुणे महापालिकेमध्ये एकत्रित काम केले आहे. ते दोघे पण माझे चांगले मित्र आहेत. तसेच मी या निवडणुकीत वैयक्तिक टीका करणार नाही. तर त्यांच्या पक्षाच्या ध्येयधोरण आणि चुकीच्या कारभाराविरोधात सातत्याने भूमिका मांडत राहणार, त्याचबरोबर आजवरचं माझं काम पाहून पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी उभे राहून मला विजयी करतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

# तमाशा पंढरीत विनापरवाना वीजजोड घेणे पडले महागात; ४५ हजारांचा भुर्दंड

**नारायणगाव । प्रतिनिधी**

नारायणगाव येथील तमाशा नगरीमध्ये विविध फड मालकांनी राहुट्या उभारल्या आहेत. मात्र या राहुट्यांमध्ये विनापरवाना वीजजोड घेणे या फड मालकांना महागात पडले असून ४५ हजार ५८० रुपयाचा दंड भरण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, तमाशा पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायणगाव नगरीमध्ये विविध फडमालकांनी एकूण ३५ राहुट्या उभारल्या असून येथे विजेचा पुरवठा विनापरवाना केला म्हणून ४५ हजार ५८० रुपयांचा दंड करण्यात करण्यात आल्याची माहिती नारायणगाव कार्यालयाचे उप कार्यकारी अभियंता सचिन बनकर यांनी दिली. बनकर यांनी सांगितले की, आनंद बबन दळवी यांनी या तमाशा राहुट्यामध्ये वीजजोड मिळावा म्हणून दि. ९ मार्च रोजी अर्ज दिला होता. त्याबाबतचे कोटेशन देखील त्यांना देण्यात आले होते. परंतु त्यांनी कोटेशन न भरता परस्पर वीजजोड घेतले. वीज वितरण कपंनीचे नारायणगाव शाखा अभियंता राजेश घोडे यांनी या राहुट्यांना दि. २७ मार्च रोजी भेट देऊन पाहणी केली असता विजेचे अधिकृत कनेक्शन न घेता विनापरवाना वीज जोडणी केल्याचे लक्षात आले. त्यांनी पंचनामा करून वायर जप्त केली.

दरम्यान तमाशाच्या राहुट्यामध्ये विजेचे कनेक्शन मिळावे याबाबतचा ज्या तारखेपासून अर्ज केला होता त्या दिवसापासून २७ मार्चपर्यंत ८९६ युनिटचा वापर केला. त्यामुळे ४५ हजार ५८० रुपयांचा दंड करण्यात आला. दंडाची रक्कम संबंधितांनी दि. २८ मार्च रोजी भरली. तसेच नवीन कनेक्शनचे डिपॉझिट देखील ४ हजार २३० रुपये त्यांनी तेव्हाच भरले. आता त्यांना रिसर्च विजेचे कनेक्शन दिले असल्याची माहिती सचिन बनकर यांनी दिली.

# मित्राचा खून करुन फरार झालेल्या आरोपीला मध्य प्रदेशातून अटक : गुन्हे शाखा युनिट 3 ची कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

मोबाईल फोन फोडल्याच्या कारणावरुन मित्राच्या डोक्यात लोखंडी तव्याने मारुन तसेच फेट्याने गळा दाबून खून केल्याची घटना महाळुंगे इंगळे गावच्या हद्दीत २८ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास घडली होती. या गुन्ह्यातील फरार आरोपीला गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने मध्य प्रदेशातून अटक केली आहे. याप्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामसिंग सुलतानसिंग गोंड (वय ३०, रा. रेयाना ता. जि. दमोह, मध्यप्रदेश) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. कालू मंगल रकेवार (वय २३, रा.महाळुंगे, ता. खेड. मूळ रा. पथरीया, ता. जि. दमुही, मध्यप्रदेश) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी कालू याचा भाऊ पप्पू मंगल रकेवार यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.




गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने गुन्ह्याचा तपास करताना घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही चेक केले. तसेच चाकण बस स्टँड, महाळुंगे परिसरात व पुणे रेल्वे स्टेशन परिसरात आरोपीचा शोध घेतला. आरोपीने मोबाईल बंद केल्यामुळे तांत्रिक अडचणी येत होत्या. पोलिसांनी आरोपी काम करत असलेल्या कंपनीत तपास केला. सखोल चौकशी करत असताना पोलीस अंमलदार हनमंते, बाळसराफ जैनक, मेरगळ यांच्या पथकाने आरोपीची माहिती प्राप्त केली. आरोपी मुळ गावी आला असल्याची माहिती मिळताच पथक मध्य प्रदेशातील आरोपीच्या गावी पोहोचले. पोलिसांचे पथक आरोपीचा शोध घेत असताना आरोपीला पोलीस आल्याची चाहूल लागली. आरोपी पळून जात असताना त्याला शिताफिने ताब्यात घेतले.

ही कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी,

पोलीस उपायुक्त गुन्हे संदीप डोईफोडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ. विशाल हिरे

यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस अंमलदार यदु आढारी, सचिन मोरे, विठ्ठल सानप, ऋषिकेश भोसुरे, सागर जैनक, राजकुमार हणमंते, रामदास मेरगळ, योगेश्वर कोळेकर, त्रिनयन बाळसराफ, राहुल सूर्यवंशी, सुधीर दांगट, समीर काळे, शशिकांत नांगरे, महेश भालचिम यांच्या पथकाने केली.

# रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना मारहाण करुन लुटणारी टोळी खडक पोलिसांकडून गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

रात्रीच्या वेळी दुचाकीवरुन जाणाऱ्यांना मारहाण करुन लुटणाऱ्या टोळीला खडक पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून सोन्याची चेन व दोन दुचाकी असा एकूण १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई घोरपडे पेठेतील मंत्रा हॉटेलच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत केली.




याबाबत रमेशकुमार गिरधारीलाल घाची (वय-२८ रा. कोंढवा) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी २९ मार्च रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास बोंबील मार्केट समोरील सार्वजनिक रोडवरुन घरी जात होते. त्यावेळी तीन जणांनी फिर्यादी यांची दुचाकी आडवली. आरोपींनी शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. तसेच जबरदस्तीने गळ्यातील ८० हजार रुपये किमतीची २० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरुन नेली. याप्रकरणी अभिषेक दशरथ वाघमारे उर्फ मम्या (वय-२२ रा. वजगाव ब्रु), मयुर किरण भोसले (वय-१९ रा. दांडेकर पुल), सुदर्शन विजय मोठे (वय-२३ रा. दांडेकर पुल) यांच्यावर भा.दं.वि. कलम ३९२, ३४१, ३२३, ५०४, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके तयार करण्यात आली होती. आरोपींचा शोध घेत असताना तपास पथकाचे पोलीस अंमलदार आशिष चव्हाण व प्रमोद भोसले यांना माहिती मिळाली की, जबरी चोरी करणारे घोरपडे पेठेतील मंत्रा हॉटेलच्या मागील बाजूला असणाऱ्या मोकळ्या जागेत आले आहेत. मिळालेल्या माहितीची खात्री करुन पोलिसांनी सापळा रचून अभिषेक वाघमारे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे मयुर भोसले व सुदर्शन मोठे यांना सापळा रचून अटक केली. आरोपींकडून चोरलेली सोन्याची चेन व दोन दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग प्रविण पाटील, पोलीस उपायुक्त संदिपसिंह गिल, सहायक पोलीस आयुक्त रुक्मिणी गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड,

पोलीस निरीक्षक (गुन्हे) संपतराव राऊत, सहायक पोलीस निरीक्षक नितीनकुमार नाईक, पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद डेंगळे, अजीज बेग, पोलीस अंमलदार किरण ठवरे, हर्षल दुडम, संदीप तळेकर, आशिष चव्हाण, प्रमोद भोसले, अक्षयकुमार वाबळे, प्रशांत बडदे, लखन ढावरे, रफिक नदाफ, सागर कुडले, तुळशीराम टेंभुर्णे, महेश जाधव, चंद्रशेखर खरात, प्रवीण गावीत, सुहास साळुंके यांच्या पथकाने केली.

# बारामती मतदारसंघात मतदानाबाबत शपथ

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता बारामती लोकसभा मतदारसंघात बारामती, इंदापूर, खडकवासला, दौंड, भोर आणि पुरंदर विधानसभा मतदारसंघात मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांतून मतदारांना मतदार यादीत नाव शोधण्यासह निवडणूक प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

इंदापूर येथे मतदार जागृती मंचच्या वतीने क्यूआर कोडद्वारे मतदार यादीत नाव शोधण्याची माहिती देण्याकरिता जिल्हा परिषद शाळा इंदापूर क्रमांक १ व २ येथे शिबिर आयोजित करण्यात आले. या वेळी विस्तार अधिकार्यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. मतदार व त्यांच्या परिचयातील शिक्षक व पालकांना मतदान करण्याचे आवाहन केले. बारामती विधानसभा मतदारसंघात पियाजियो कंपनीतील सुमारे ३०० पेक्षा अधिक



अधिकारी आणि कर्मचार्यांनी मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. या वेळी निवडणुकीत मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले.

खडकवासला विधानसभा मतदारसंघात वडगाव बुद्रुक येथे महिला बचत गटाच्या वतीने विठ्ठल मंदिर येथे मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली. या वेळी महिला मतदारांनी मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. दौंड विधानसभा मतदारसंघात यवत आणि दहिटणे येथे अंगणवाडीस्तरावर गृहभेटीचे आयोजन केले गेले. या वेळी महिला मतदारांना मतदान प्रक्रियेची माहिती देत मतदानाचे आवाहन करण्यात आले. अंगणवाडीसेविका आणि महिला मतदारांनी मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेतली. भोर विधानसभा मतदारसंघात अरिहंत महाविद्यालय बावधन येथे मतदार जनजागृती करण्यात आली. या वेळी मुळशी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, शिक्षक आणि ९२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धेसोबतच मतदान करण्याबाबत प्रतिज्ञा घेण्यात आली.

अनंतराव पवार महाविद्यालयाच्या विद्यार्थी व शिक्षकांनी पिरंगुट बसस्थानक चौक येथे मतदार जागृती फेरीचे आयोजन केले. या वेळी सुमारे १५० पेक्षा अधिक विद्यार्थी-पालक उपस्थित होते. माळवाडी (वाल्हे) येथे मतदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा. परिसरातील इतरही पात्र नागरिकांना मतदान करण्याबाबत प्रोत्साहित करावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# लोकसभा निवडणुकीवर माळशिरसकर टाकणार बहिष्कार

**पुणे । प्रतिनिधी**

पुरंदर उपसा जलसिंचन योजनेची पाणी मागणी असूनही माळशिरस गावचे पाणी बंद केल्याने गावाला पिण्याचे पाणी नसल्याने पाणी न मिळाल्यास आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा तसेच नेत्यांना गावबंदी करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे. पुरंदर उपसा जलसिंचन योजनेचे पाणी न मिळाल्याने माळशिरस ग्रामस्थांनी सोमवारी पुरंदर उपसा योजनेच्या सासवड येथील कार्यालयात आंदोलन केले.



माळशिरस येथील शेतकरी प्रवीण कामठे यांनी पुरंदर उपसा योजनेच्या पाण्यासाठी कार्यालयात अंगावर डिझेल ओतून निषेध व्यक्त केला. ग्रामस्थ व पोलिसांनी वेळीच आवरल्याने पुढील अनर्थ टळला. आंदोलन करूनही पाणी न मिळाल्याने माळशिरस ग्रामस्थांनी मंगळवारी तातडीची गाव बैठक बोलावली. यात जोपर्यंत पुरंदर उपसा जलसिंचन योजनेचे पाणी मिळत नाही तोपर्यंत आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकून निषेध नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे कोणत्याही नेत्याला गावात येऊ देऊ नये, असाही निर्णयघेण्यात आला.

पाणी न मिळाल्यास आंदोलनाची पुढची दिशा म्हणजे माळशिरस ग्रामस्थांच्या वतीने जेजुरी पोलिस स्टेशनला निवेदन देऊन वाघापूर चौफुला येथे 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचा गाव बैठकीत एकमुखी निर्णय घेण्यात आला. या वेळी माळशिरसचे उपसरपंच अशोक यादव, माळशिरस सोसायटीचे चेअरमन सदाशिव डोंबाळे, युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष माऊली यादव, ग्रामपंचायत सदस्य शरद यादव, सुखदेव मराठे, दीपक यादव, नवनाथ यादव, दादा यादव, शिवसेनेचे संतोष यादव, असंख्य माळशिरस ग्रामस्थ उपस्थित होते.